# *जनावर*

**कथा** : *भारत सासणे*
**पटकथा/संवाद/गाणी** : *प्रल्हाद जाधव*
**कालावधी** : 90 *मिनिटे*

ü

# महत्वाचे

श्री. भारत सासणे हे महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागात विविध पदांवर कार्यरत होते. मी सुद्धा सरकारी नोकरीत असल्यामुळे काही ना काही निमित्ताने आमचा संपर्क असायचा. मी त्यांच्या साहित्याचा चाहता होतो. खूप वर्षांपूर्वी म्हणजे साधारणपणे ३०/३५ वर्षांपूर्वी त्यांची ‘दीपावली’च्या दिवाळी अंकातील ‘उंट’ ही कथा माझ्या वाचनात आली. त्या कथेने मला झपाटून टाकले. दरम्यान मी नाटक-एकांकिका लिहित होतो पण  चित्रपटकथा लिहावी असेही माझ्या मनात येत होते. त्या पार्श्वभूमीवर या कथेवर आपण चित्रपट लिहावा असे मला वाटले आणि मी तो एका झपाट्यात लिहून काढला.

नाटक-सिनेमाशी संबंधित अनेक समविचारी मित्रांना मी ही चित्रपट कथा वाचून दाखवली… प्रत्येकाला ती आवडत होती पण निर्मात्याअभावी गाडी पुढे सरकत नव्हती. दरम्यानच्या काळात  सासणे यांच्या एका कथेवर ‘सूर्योदय’ हा चित्रपट आला. त्यांच्या इतर कथांवरही चित्रपट येऊ लागले. त्याच ओघात एका निर्मात्याने त्यांच्याकडून ‘उंट’चे अधिकृत हक्क मिळवले आणि हौसेपोटी लिहिलेली माझी ही चित्रपटकथा मागे पडत केवळ ‘रेकॉर्डच्या पातळीवर’ शिल्लक राहिली. अद्यापही सासणे यांच्या कथेवरील हा चित्रपट पडद्यावर साकार होऊ शकलेला नाही. भविष्यात कधी तो होणार असेल आणि त्यात या माझ्या लेखनाची संबंधितांना काही मदत होणार असेल तर मी त्याचे स्वागतच करीन.

# कथासूत्र

महाराष्ट्रातील एका छोट्या - नगरपालिकेच्या शहरात घडणारी ही एक कथा ! वर वर साधी सोपी वाटणारी परंतु आतून तितकीच गुंतागुंतीची आणि माणसांचे चेहेरे आणि मुखवटे यांतील फरक स्पष्ट करणारी.

ठिकाण नगरपालिकेचं. तेथील उद्यानात हवा असतो एक उंट. मुलांना आकर्षित करण्यासाठी, त्यांना पाठीवर बसवून फिरवण्यासाठी. उंट आणणं हे वरकरणी एक छोटंस काम. पण तो आणण्यामागं असणारं राजकारण आणि त्याचं श्रेय उकळण्यासाठी अनेक लोकांची चाललेली चढाओढ हा या कथेचा गाभा.

शिपायापासून मुख्याधिकाऱ्यापर्यंत आणि नगराध्यक्षापासून मुख्यमंत्र्यापर्यंत अनेकजण या नाट्यपूर्ण कहाणीत सहभागी आहेत. उंट आणण्याच्या प्रक्रियेत प्रत्येकाला वेगवेगळ्या कारणानं रस आहे. सत्ता टिकवण्यासाठी, कुरघोडी करण्यासाठी, विरोधकांना नामोहरम करण्यासाठी, प्रमोशन मिळणार आहे म्हणून, नोकरी टिकणार आहे म्हणून, पगार मिळणार आहे म्हणून, नाईलाज आहे म्हणून... इतरही अनेक कारणं ! पण मुख्य म्हणजे नोकरशहांना, सत्ताधाऱ्यांना याचं श्रेय उपटायचं आहे. हे श्रेय उपटण्यासाठी सत्य, निष्ठा, प्रामाणिकपणा माणुसकी यासारखी मूल्ये पायदळी तुडवण्यात त्यांना काहीही गैर वाटत नाही.

राजस्थानातून उंट घेऊन येण्याची प्रत्यक्ष जबाबदारी पडलीय बाबू, दाबके आणि रासबिहारी या तीन कर्मचाऱ्यांवर ! हे सगळे गरीब लोक, विविध कारणांनी गांजलेले, भेदरलेले, गोंधळलेले, हतबल…पण संवेदनशीलता जपून असलेले. परस्पर नातेसंबंधांचा आदर करणारे, एकमेकांच्या आधारानं चालणारे, एकमेकांना मदत करणारे.

त्यांना कळत नाही की आपणाला कोणीतरी राबवून घेतंय, आपला वापर करून घेतंय; उलट आपल्या जगण्याला ते एक तत्वज्ञानाचा मुलामा देतात. `उंट आणणं हे देवाचं काम` असं मानून आपल्या छोट्या मोठ्या समस्यांचा विचार न करता स्वत:ला कामात अधिकच गाडून घेतात !

दुसरीकडे राक्षसी महत्वाकांक्षा असणारं नेतृत्व. पुढाऱ्यांचं-नोकरशहांचं ! त्यांना सर्वसामान्य माणसाच्या दु:खाची नोंद घेण्याची गरज वाटत नाही. आपलं स्वत:चं भलं कसं करता येईल एवढीच त्यांना काळजी असते. एखाद्याच्या नरडीवर पाय देऊन वर जाणे हे त्यांच्या यशाचं तत्वज्ञान; तेच त्यांच्यासाठी अंतिम सत्यही असतं.

दुसऱ्याच्या कामाचं श्रेय उपटणं हा एक प्रकारे मानवी स्वभावच. जगभर सर्वत्र, सर्वच कालखंडात आढळणारा... पण अशा प्रकारच्या क्षुद्र श्रेयापलिकडे जाऊन अधिक व्यापक अर्थानं जीवनाकडे पाहणारी माणसंही आपल्या अवती भोवती असतात. ती संख्येनं कमी असतील, गरीब असतील, उपेक्षित असतील पण जीवनाच्या एका वेगळ्याच किनाऱ्यावर ती आपल्याला घेऊन जातात. ही दोन्ही रूपे इथं आहेत म्हणूनच जगभरातील साऱ्याच प्रेक्षकांना ही कहाणी आपली वाटेल. त्यांना आरसा दाखवून विचारप्रवृत्त करील आणि सकारात्मक विचारांचा मार्गावर कार्यप्रवणही करू शकेल !

------

ü

1. दुपार.

वाळवंट. फ्रेममध्ये एक हलती, लवलवती अपरिचित गोष्ट. नेमकं काय आहे ते आधी लक्षात येत नाही. एक्स्ट्रीम क्लोजअपवर असलेली झूम हळूहळू मागे येते. ती वस्तू म्हणजे एका उंटाची नाकपुडी. नाकपुडीवरून कॅमेरा त्याच्या तोंडावर, मानेवर, संपूर्ण शरीरावर फिरत झूम आऊट होतो. वाळवंटात बसलेला उंट. सोसाट्याचे वादळ. (संगीत.)

उंटाच्या बाजूला तीन माणसं पडलेली आहेत. ती क्रमाक्रमाने दिसतात. आधी एका माणसाच्या हाताचा पंजा दिसतो. हळूहळू पूर्ण हात. मग माणूस दिसतो. हा दाबके. नगरपालिकेत नोकरी करणारा, शिपायाचा क्लार्क झालेला कर्मचारी, वय 45, बुटका, भयग्रस्त. त्याच्या अंगावर इकडे-तिकडे वाळू. नाकातोंडातही वाळू. डोळे उघडे. केवीलवाणे. तो डोळ्यांची उघडझाप करतो. जिवंत आहे हे लक्षात येतं. तो ओठांवरून जीभ फिरवतो.

दाबके : पाणी... पाणी...

(दाबकेच्या एका बाजूला बाबू पडलेला आहे. हा नगरपालिकेतील दुसरा कर्मचारी - शिपाई. हडकुळा. संशयी. भित्रा. वय 45. त्याचीही स्थिती दाबकेसारखी झालेली. ओठ सुकलेले. तो ओठावरून कोरडी जीभ फिरवतो.)

बाबू : पाणी... पाणी...

(दाबकेच्या दुसऱ्या बाजूला कुशीवर पडलेला रासबिहारी दिसतो. हा नगरपालिकेतील ट्रक-ड्रायव्हर. राकट, रांगडा, बिनधास्त, रंगीला... तत्वज्ञासारखं बोलणारा... या दोघांच्या तुलनेत थोडा ॲलर्ट. डोळ्यात चमक. धैर्य. जगण्याची उमेद. त्याला सारे बिहारी असं म्हणतात. तोही `पाणी पाणी` करीत आहे.)

(एकदम गिधाडांचा चित्कार ऐकू येतो. कॅमेरा रासबिहारीच्या ॲन्गलने आकाशात पाहतो. तेथे गिधाडं घिरट्या घालीत आहेत. (संगीत) रासबिहारी ॲलर्ट होतो. आवंढा गिळतो. बाबू वळवळतो. दाबके जीवाच्या आकांतानं उठण्याचा प्रयत्न करतो. आपलं मरण जवळ आलंय आणि गिधाडं आपल्याला जिवंतपणी खाणार आहेत असे भाव त्यांच्या डोळ्यात. पुन्हा आकाशातली गिधाडं दिसतात. आता त्यांची संख्या वाढलेली.

रासबिहारी आपल्या कोपरीत हात घालतो. एक चाकू बाहेर काढतो. नजर थंड, भेदक. बाबू त्यांच्याकडे पाहतो, दाबकेही पाहतो. पुढे काय होणार याची त्यांना कल्पना येते. रासबिहारी चाकूचे पाते बाहेर काढतो आणि उंटाकडे पाहतो. चाकूच्या पात्यावर सूर्य चमकतो. उंट रासबिहारीकडे पाहतो, गुरगुरतो. रासबिहारी उठतो आणि पूर्ण ताकदीनिशी धडपडत उंटाकडे निघतो. दाबके जिवाच्या आकांतानं उठतो. खुरडत खुरडत रासबिहारीच्या मागे जातो, त्याच्यामागे बाबूही तसाच सरपटत पुढे जाऊ लागतो. (रासबिहारी चाकू उगारून उंटाच्या पोटात खुपसण्याच्या

ü

पवित्र्यात)

दाबके : (रासबिहारीच्या पायाला मिठी घालून त्याला प्रतिकार करत) नाही... नाही... नाही... तुझे मेरी कसम... उंट को हात मत लगाना.

बिहारी : (ओठावरून जीभ फिरवत) अगर हम जिंदा रहेंगे तो दुसरा उंट ला सकते है... (उंटाच्या पोटात चाकू खुपसण्याचा निर्धाराने पुढे सरकतो.)

दाबके : नही बिहारी नही...भगवानके वास्ते... (बाबूच्या अंगात त्राण नाही. तोही बिहारीला परावृत्त करण्याचा प्रयत्न करतो. रासबिहारी समोर पाहातो. गिधाडे आता अधिक जवळ आलेली. एक गिधाड त्यांच्या जवळ उतरलेले. चाल करून येणारे... रासबिहारी कुणाचेही न ऐकता त्वेषाने पुढे जाऊन उंटाच्या पोटात चाकू खुपसतो आणि गोल फिरवून बाहेर काढतो. पाण्याऐवजी रक्ताची चिळकांडी उडते. बिहारीच्या तोंडावर रक्ताचा फवारा उडतो. उंट तडफडतो. ओरडतो. त्याची आतडी बाहेर येतात. रक्त पसरते. दाबके, बाबू भयभीत झालेले-असहाय. उंट पाय झाडत निपचित पडतो. त्याचे निष्प्राण करूण डोळे क्लोजअपमध्ये. (संगीत)

2. दाबके किंचाळत झोपेतून जागा होतो. बाजल्यावर उठून बसतो. त्याची छोटी खोली. घामाने भिजलेला...त्याला हे एक स्वप्न पडलेलं असतं. तो कमालीचा अस्वस्थ. घाम टिपतो. खोलीतून बाहेर येतो. चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची वस्ती शांत... झोपलेली...सारं
शहर शांतपणे झोपलेलं. आकाशात चंद्र, चांदणं पडलेलं... दाबके चंद्राकडे पाहतो. चंद्र वितळतो. दाबकेला एकेक प्रसंग फ्लॅश बॅकने आठवू लागतो.

3. दुपार.
खूप उंचावरून, कॅमेरा मंदगतीने शहराकडे सरकत आहे. आधी अस्पष्टपणे आणि नंतर स्पष्टपणे शहराच्या खुणा दिसू लागतात. थीम म्युझिक वाजू लागते. कारखान्यांची धुराडी, उंच इमारतींचे टेरेसेस, पाण्याच्या टाक्या, झाडांचे शेंडे दाखवत कॅमेरा शहराच्या अधिक जवळ येऊ लागतो.

मेन रोड, रहदारी, माणसांची गर्दी दिसू लागते. `खर्र खट् धडाम धडाम` असा ट्रकचा आवाज येऊ लागतो. त्या आवाजाबरोबरच कॅमेऱ्याने दूरवरून येणारा नगरपालिकेचा कचऱ्याचा ट्रक फ्रेममध्ये पकडलेला आहे.

टॉप ॲन्गलने ट्रकचा पाठलाग करीत कॅमेरा एका छोट्याशा उड्डाणपुलावर येतो. पुलाखाली ट्रक शिरण्यापूर्वी त्याच्या एका बाजूवर लिहिलेली `धुळे नगरपालिका` अशी पुसटशी अक्षरे दिसतात. ट्रक पुलाच्या दुसऱ्या बाजूने बाहेर पडतो, कॅमेरा समोरून-एका बाजूने चित्रण करतो, गुळगुळीत झालेल्या, गेटर टाकलेल्या टायरवरुन आणि गंजलेल्या मडगार्डवरून वर जातो आणि पुन्हा टॉप ॲन्गलने ट्रकचा पाठलाग करीत राहतो.

ü

ट्रकमध्ये शिगोशिग केरकचरा भरून ठेवलेला आहे. त्यातच कोपऱ्यातल्या एका उंचवट्यावर उपडे घातलेले घमेले, फावडे आणि त्यावर बसलेला बाबू हा सफाई कामगार दिसतो. ट्रकची खडखड चालूच. ट्रकला पॉम् पॉम् वाजणारा फुग्याचा हॉर्न. तर डावीकडे पिण्याच्या पाण्याची जाड पिशवी कायमची लटकवलेली.

कॅमेरा आता डम्पिंग ग्राऊंडवर. समोरून येणाऱ्या ट्रकचे चित्रण करीत आहे. ट्रक हळूहळू कचऱ्याच्या प्रचंड मोठ्या मोठ्या ढिगाऱ्याकडे सरकतो आणि वळून कचऱ्याच्या दिशेला पाठ करून उभा राहतो.

करकरते दार उघडून ड्रायव्हर रासबिहारी खाली उडी मारतो. मागच्या बाजूला येतो. बाबूही वरून घमेले फावडे उचलून फाळक्यावरून उडी मारुन खाली येतो. दोघेही मूकपणे फाळक्याच्या दोन टोकांजवळ उभे राहून सराईतपणे हूक काढतात. फाळका खाली पडतो आणि त्याचबरोबर घाणीचा एक ढिगही खाली कोसळतो.

रासबिहारी अंगावरची घाण झटकत मागे येतो आणि बंडीतून विडी माचीस काढून विडी पेटवून तिचा एक झुरका घेतो. कलंदरपणे धूर आकाशात सोडतो आणि बाबूकडे पाहू लागतो. बाबू वर चढून फावड्याच्या साहाय्याने झपाझप घाण खाली करू लागतो. त्याच्या कपाळावरचा घाम दिसतो. मध्येच एका ठिकाणी तो नेट लावून फावडे ओढतो. पण जमत नाही. म्हणून पुन्हा ताकद लावून दुसरा प्रयत्न करतो. घाणीचा आणखी एक ढिग खाली कोसळतो. क्षणभराच्या विसाव्यासाठी बाबू ट्रकच्या भिंतीजवळ येतो. थूऽऽऽ करून बाहेर पिचकारी टाकतो आणि -

बाबू : काय नशीब तेच्या मायला...

बिहारी : नसीब को क्यू गाली देता है ? मैंने कहा है तुम्हें की कौनसा भी काम बुरा नहीं. (बाबू त्याच्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत पुन्हा फावडे उचलतो. बिहारी पुढे बोलतच राहतो.)

बिहारी : हमलोग यें गंदगी निकालते है इसके वास्ते तो ये शहर साफ सुथरा रहता है ना ?

बाबू : बास झालं तुझं तत्वज्ञान. इथं येऊन थोडं काम करून बघ, कंबरडं मोडून जातंय पार... (हंऽऽऽ करून फावडे मारतो)

बिहारी : मालूम है सब. मैने भी पहले ये काम किया है कभी... मेहेनतसे, लगावसे... इसलिए तो बाद में परमोसन मिला, ड्रायवर बना...

बाबू : (रोखून पहात) पन टेंपरवारी !

बिहारी : तो क्या हुआ ? एक ना एक दिन पर्मनंट हो जाऊंगा. और तू कंहा का पर्मनंट है ? (बाबू त्याच्याकडे दुर्लक्ष करुन फावडे चालवू लागतो. बिहारी विडीचा खोल झुरका मारतो.)

(ट्रिंग ट्रिंग असा सायकलच्या घंटीचा आवाज येतो. बिहारी मान वळवून पाहातो.

ü

समोरून सायकलवरून येणारा दाबके त्याला दिसतो. दाबके हा नगरपालिकेतील आणली एक कर्मचारी. शिपायाचा क्लार्क झालेला. मध्यम बांध्याचा. प्रामाणिक, मेहेनती, निष्ठावान. वय 45. दात पुढे आलेले. जाड भिंगांचा चष्मा. कानावरून लोंबणाऱ्या चष्म्याच्या दोऱ्या. नेहेमी पांढरे कपडे घालणारा. त्याच्या हातावर नेहमी घड्याळ. घड्याळात तारीखही दिसण्याची सोय.)

बिहारी : (स्वत:शी) ये साला दाबके यहा क्यूं आया है...

बाबू : (वरूनच पाहात) काय रे, काय झालं दाबके ?

दाबके : (सायकल स्टँडला लावत) सीओ साहेबांचा निरोप हाय.

बाबू : सायबांचा निरोप ? (संगीत.)

दाबके : तुम्हाला बोलावलय त्यांनी, आत्ताच्या आत्ता (बाबू एकदम अवसान गळाल्यासारखा खाली बसतो. बिहारीही थोडा सावध झालेला.)

बिहारी : अब क्या हुआ, नोकरी से निकालने का पक्का हुआ क्या ?

बाबू : आज ना उद्या गांडीवर लाथ बसणारच होती...

बिहारी : (डिवचत) तू क्यूं चिंता करता है ? तेरी चंद्रा जो है...

बाबू : (चिडत) देख बिहारी, उस का नाम मत लेना...

बिहारी : (हसत) तू क्या करेगा रे गांडू ?

बाबू : (आक्रमकपणे) बिहारीऽऽऽ

दाबके : (मध्यस्थी करत) मी काय सांगतोय ते राहिलं बाजूला आणि झाली तुमची भांडणं सुरू. हे बघा, काम आटपा लवकर आणि चला साहेबांकडं. आर्जन्ट बोलवलंय त्यांनी.

बाबू : पन कशासाठी ? तुज्याजवळ काय बोलले का ?

दाबके : माझ्याजवळ कशाला बोलतील, मी काय कलेक्टर हाय का ? तू आटप. (बाबू त्वेषाने फावडे चालवू लागतो. बिहारी एका अंतस्थ चिडीने विडीचा अधिक खोल झुरका मारतो. खोकू लागतो. त्याला भयानक ढास लागते. खोकता खोकता तिथंच खाली बसतो. तोंडातून लाळ, डोळ्यातून पाणी येते. दाबके त्याची पाठ चोळतो.)

दाबके : किती वेळा सांगितलं की बिडी-चिलीमचा नाद सोडून दे. (त्याही स्थितीत बिहारी मान हलवत 'काही विशेष झालं नाही' असं सुचवत आहे.)

(वर बाबू घाण उपसता उपसता मध्येच एकदम "अरे देवा" म्हणत थांबतो. हादरलेला. डोळे विस्फारलेले.नि:शब्द झालेला... अवसान गळालेले. घाम पुसत तो तिथेच कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर बसतो. (संगीत) बिहारी आणि दाबके ट्रकवर चढून...

बिहारी : क्या हुआ ? रात को ज्यादा पी ली थी क्या ?

बाबू : (नि:शब्द. भयग्रस्त चेहेरा)

दाबके : आरं काय झालं काय ? चक्कर आली का ? (बाबू समोर बोट दाखवतो. दोघेही तिकडे पाहतात. कचऱ्याच्या ढिगाऱ्यात एक मृत अर्भक. हात-पाय-डोके...

ü

क्रमाक्रमाने दिसते. (संगीत.) दाबके "अरेरे च् च्..." तर रासबिहारी "च्यॅयला ह्यांच्या..." अशी प्रतिक्रिया देतो. दाबके खिशातून घडी केलेला पांढरा स्वच्छ रूमाल बाहेर काढतो. त्यात ते अर्भक गुंडाळतो. कुदळ हातात घेऊन बाबू खाली उडी मारतो. एक खड्डा खणतो. त्यात तिघेही ते अर्भक ते पुरतात. वरून माती लोटतात आणि विषण्णपणे बसून राहतात. संगीत.)

4. नगरपालिकेची संपूर्ण इमारत दिसते. त्यानंतर सी.ओं.च्या दालनाबाहेर लावलेली 'श्री.ए.डी.साने मुख्याधिकारी' ही पाटी दिसते. पाटीच्या खाली एका स्टूलवर महिला शिपाई-चंद्रा बसलेली दिसते. ही बाबूची बायको. वयाची चाळीशी गाठलेली. मुळची सुंदर पण परिस्थितीने पिचलेली. डोळ्यातली चमक अद्याप टिकून. उत्साही. कामाचा उरक असणारी. महिला शिपायांना मिळणारी निळ्या काठाची पांढरी साडी तिने नेसली आहे. निर्विकारपणे बसलेली चंद्रा अचानक उठून उभी राहाते. कॅमेरा तिच्या अँगलने पाहातो. कमानीजवळ एक अँबॅसिडर थांबलेली आहे. तिच्यातून नगराध्यक्ष आबासाहेब पाटील उतरतात आणि झपाझप सी.ओं.च्या चेंबरकडे येऊ लागतात. उंच. किडकिडीत. खादीचा सदरा धोतर, वय 60. महत्वाकांक्षी व्यक्तिमत्व. चंद्रा सी.ओ.च्या दालनाचा दरवाजा लोटून आत जाते. सी.ओ. एक फाईल चाळण्यात व्यग्र. ते मान वर करत.

सी.ओ. : काय चंद्रा ?

चंद्रा : आबासाहेब हिकडंच येत्याती...

सीओ : (उठून उभे राहात) अस्सं ?

चंद्रा : व्हय.
(असं म्हणून चंद्रा बाहेर येते. तोवर आबासाहेब तिथवर पोहोचलेले. चंद्रा हसत हसत दरवाजा बाहेरून आत लोटून धरत उभी राहते. आबासाहेब तिच्याकडे एक कटाक्ष टाकून आत येतात. तोवर सी.ओ. आपली खुर्ची सोडून दारापर्यंत आलेले.)

सी.ओ. : याऽऽऽ याऽऽऽ आबासाहेब, कधी आलात दौऱ्यावरून ? (त्यांना अदबीने बाजूच्या खुर्चीवर बसण्याचा संकेत करीत) मला कळवलं असतं तर मी आलो असतो. आपण कशाला तसदी घेतलीत ?

आबा : (थोडे तिरकसपणे) 'स्वत: मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही' शीओ सायेब.

सी.ओ. : म्हणजे ?

आबा : मुन्शीपाल्टीच्या प्रत्येक बारीकसारीक गोष्टीत आमालाच लक्ष घालावं लागनार असं दिसतंय आता...

सी.ओ. : काय झालं ?

आबा : तुम्ही तरुण आहात. डायरेक्ट रिक्रूट आहात. कामाचे डोंगर हलवायला पाहिजेत तुम्ही. निवडणूका तोंडावर आल्यात...

सी.ओ. : पण म्हणजे... नेमकं कशाविषयी बोलताय आपण ? (चंद्रा एका ट्रे मध्ये दोन ग्लास

ü

पाणी आणते आणि टेबलावर ठेवून निघून जाते.)

आबा : महिनाभर आम्ही बाहेर गेलो काय आणि सगळा कारभार थंडावला काय...

सी.ओ. : (न उमजून पाहत राहतो)

आबा : बगीचा सुकलाय आपला... तिथली झोपडपट्टी हलवून किती दिवस झाले, सहा म्हैन्यापासून सांगतोय तुमाला...

सी.ओ. : माझं ऐकून तर घ्या साहेब…

आबा : लोक जाता येता विचारतात काय करताय म्हणून ! बागेतला उंट मरून वर्ष होऊन गेलं... मुलांची करमणूक होत होती, उंटावरून फिरायला मिळत व्हतं त्यांना. ती सुद्धा बोंबा मारू लागलीत आता... पेपरात बातम्या आल्या तर पंचनामा होईल आपला.

सी.ओ. : (लक्षात येऊन स्मीत करीत) काही काळजी करण्याची आवश्यकता नाही साहेब. सगळी व्यवस्था झालीय आता.

आबा : म्हणजे ?

सी.ओ. : तेच सांगतोय मी. 'गार्डन सुपरिन्टेन्डंट'ची पोस्ट भरलीय, हाताखाली माणसं दिलीत त्याला चार. बोलता बोलता बागेचं रूप बदलून टाकलंय त्यांनी. (ड्रॉवरमधून एक फाईल काढून नकाशा दाखवत.) हा बागेच्या नुतनीकरणाचा प्लॅन. हा इकडे मुलांचा सेक्शन, त्यांच्यासाठी झोपाळे-घसरगुंड्या, सी-सॉ... इकडे सिनिअर सिटीझन्ससाठी स्वतंत्र जागा. हा ट्रॅक साऱ्यांना फिरण्यासाठी, इकडे छोटं प्राणी संग्रहालय... आणि इथे मधोमध म्युझिकल कारंजा... राज्यातल्या कोणत्याही बी क्लास मुन्सीपालिटीमध्ये असं उद्यान नसेल. पालकमंत्री खूष होतील तुमच्यावर, सी.एम.पाठ थोपटतील...

आबा : (थंड होत) आय सी...

सी.ओ. : आपल्याला आणखी एक गोष्ट करावी लागणार आहे.

आबा : कोणती ?

सी.ओ. : बागेतल्या प्राण्यांची नीट काळजी घ्यायची तर आपल्याकडे आता स्वतंत्र व्हेटर्नरी डॉक्टर पाहिजे. किती दिवस पंचायत समितीच्या डॉक्टरवर अवलंबून राहणार आपण !

आबा : उद्याच्या बैठकीत ठेवा विषय... आपण ठराव करून घेऊ. मी कमिशनर साहेबांशी बोलतो.

सी.ओ. : आधी तुम्ही मेंबरना पटवून द्या. रस्ते आणि गटारं ह्या पलीकडे काहीच डोक्यात येत नाही त्यांच्या…(आबासाहेबांचा धूर्त पण विचारमग्न कटाक्ष.) मार्चअखेर तोंडावर आहे. शॉर्ट टेंडर नोटीस काढून 31 मार्च पूर्वी सगळं काम आटपून टाकू.

आबा : (विचारमग्न. कांही क्षणांनी) उंटाचं काय झालं ?

सी.ओ. : (आत्मविश्वासाने) उंट येतोय. बिकानेरला कॅमल रिसर्च सेंटर आहे. तिथल्या 'प्रॉजेक्ट ऑफिसर'शी बोललोय मी.

आबा : (थोडे सैलावत) आपण असं करू...

सी.ओ. : बोला...

ü

आबा : एक समारंभ करू मोठा. मी अण्णासायबाना सांगून सी.एम.ना आणण्याची गळ घालतो... कधीची तारीख ठरवायची ?

सी.ओ : एखादा महिना लागेल अजून. (टेबलावरचे कॅलेन्डर पाहत) बालदिनाचा मुहुर्त काढू या का ? 14 नोव्हेंबर ? नेहरू जयंती ?

आबा : (खूष होत) ठीक आहे. रात्री बोलतो मी मुंबईला आणि सांगतो तुम्हाला. पण ते उंटाचं नक्की झालंय ना ?

सी.ओ. : अगदी निर्धास्त रहा तुम्ही ! व्यास म्हणून ऑफिसर आहे तिथं. एक चांगला उंट तयार ठेवलाय त्यानं आपल्यासाठी. फक्त ताब्यात घ्यायचाय... कार्यक्रमाचं पक्क झालं की दोन दिवस आधी हजर इथं.

आबा : (आता खूष होत) वा, वा... हे एकदम बेस्ट झालं. एवढा प्रोग्रॅम सक्सेसफूल करून द्या... पुढच्या वर्षी आय.ए.एस.मध्ये तुमचं प्रमोशन नक्की. (हसत हसत उठतात. सी.ओं.चा कृतज्ञ चेहेरा.)

5. (सकाळ.

मुख्यमंत्र्यांचा बंगला. एका प्रशस्त टेबलासमोर मुख्यमंत्री दादासाहेब देशमुख बसलेत. उंचेपुरे-धिप्पाड व्यक्तिमत्व. वय 65. हसतमुख हातात सोन्याचे कडे. सोनेरी घड्याळ. समोर चहाचा ट्रे एक चमचा साखर कपात टाकून हलवतात. दरवाजा उघडून कात्रणांची फाईल घेऊन पीआरओ आता येतो. आणि त्यांच्या बाजूला अदबीने उभा राहतो. गव्हाळ वर्ण, सहा फूट, सफारीमध्ये.)

सी.एम. : (घोट घेत) काय म्हणतात आजची वर्तमानपत्रं ?

पीआरओ : (फाईल पुढे करत) ही कात्रणं सर.

सी.एम. : विशेष काही ?

पीआरओ : विशेष काही नाही पण ही म.टा.त एक इंटरेस्टिंग बातमी आहे... (सी.एम. उत्सुकतेनं त्याच्याकडे पाहतात. तो वाचून दाखवतो.) वनमंत्र्यांच्या गावी बगीचा सुकलाय…स्वत:च्या मतदारसंघात लक्ष घालायला त्यांना वेळ नाही...

सी.एम. : (हात पुढं करीत) बघू इकडं...

पीआरओ : (फायलीतील ते कात्रण काढून देतो. सी.एम. पाहतात. तो पुढे बोलू लागतो.) आपण लक्ष घालावं अशी लोकांची अपेक्षा आहे. (सी.एम. वनमंत्र्यांच्या फजितीसंबंधी वाचता वाचता मनोमन सुखावल्याचे जाणवते. पी.आर.ओ. एक पोस्टकार्ड पुढे करत) कालच्या टपालातलं हे एक पत्र..य़ाच बातमीशी संबंधित आहे. तुमच्या नावानं आलंय.

सी.एम. : (पत्र पाहत) पाचवीतल्या मुलीचं पत्र ? (पी.आर.ओ. मान हलवतो. सी.एम. मनातल्या मनात वाचू लागतात. वाचता वाचता एक कारस्थानी दृष्टीक्षेप पीआरओकडे टाकतात. तोही निष्ठा व्यक्त करणारी प्रतिक्रिया देतो. सी.एम. धूर्तपणे) माझ्या सहीनं उत्तर पाठवा तिला...

पीआरओ : (सी.एम.च्या मनातलं ओळखत) येस सर.

ü

सी.एम. : आणि अण्णासाहेबांना बुधवारी भेटायला बोलावलंय म्हणून निरोप द्या. कॅबिनेट मिटिंगनंतर संध्याकाळी 5.30 ची वेळ द्या !

पीआरओ : येस सर !

(सी.एम. चहाचा घुटका घेतात. त्यांच्या मनात काय चालले आहे याचा अंदाज त्यांच्या चेहेऱ्यावरून येत नाही.)

6. (संध्याकाळ.

मंत्रालय. मुख्यमंत्री कार्यालय. वनमंत्री अण्णासाहेब बोरावके आपल्या दालनासमोरून लांब कॉरिडॉरमधून झपाझप मुख्यमंत्र्यांच्या दालनाकडे यायला निघालेले आहेत. द्वारपाल अदबीनं दरवाजा उघडतो. अण्णासाहेब आत शिरतात)

अण्णा : (दोन्ही हात जोडून) नमस्कार, दादासाहेब !

सी.एम. : याऽऽऽ याऽऽऽ अण्णासाहेब. बसा-बसा... !

अण्णा : आपला निरोप होता...

सी.एम. : थोडं महत्वाचं काम होतं म्हणून तसदी दिली तुम्हाला. (अण्णासाहेब टोपी काढून अस्वस्थपणे टाळू खाजवतात. टोपी पुन्हा घालून सावधपणे बसतात.) तुम्ही आमच्या विश्वासातले, म्हणून महसूल आणि वने ही दोन्हीही खाती तुमच्याकडं दिली...

अण्णा : मी समजलो नाही...

सी.एम. : छोट्या छोट्या निर्णयासाठी तुम्ही अधिकाऱ्यांवर अवलंबून राहता... नोकरशाही वरचढ होते त्यामुळे. लोकप्रतिनिधींच्या इमेजलाही धक्का बसतो.

अण्णा : पण दादासाहेब... तुम्ही कशाविषयी...

सी.एम. : धुळे नगरपालिकेचं सानेगुरूजी उद्यान… ('समजलं' या अर्थी अण्णासाहेब मान हलवतात.) तिथली झोपडपट्टी उठवायला काय काय करावं लागलं हे चांगलं माहिताय तुम्हाला. (सावधपणे ऐकू लागतात.) त्या उद्यानाच्या रिनोवेशनला आम्ही परमिशन दिली… निधी दिला. कशासाठी ? आमदार जयसिंगराव जाधवांनी विधानसभेत काय गोंधळ घातला होता आठवतंय ना ?

अण्णा : मी आबासायबांना आणि शीओंना लक्ष घालण्याच्या सूचना दिल्या होत्या...

सी.एम. : इतक्या महत्वाच्या प्रकरणात तुम्ही स्वत: लक्ष घालावं अशी अपेक्षा होती माझी.

अण्णा : पण दादासाहेब...

सी.एम. : बगेत साधा उंट उपलब्ध करुन देऊ शकत नाही तुम्ही मुलांना ?

अण्णा : आधी एक होता...

सी.एम. : तेच सांगतोय मी. तो मरून आता वर्ष होत आलं.

अण्णा : मी चौकशी करतो दादासाहेब...

सी.एम. : त्यात कसली चौकशी करताय. पंधरा दिवसात उद्यानाचं काम झालं पाहिजे आणि उंट आला पाहिजे…

ü

अण्णा : बरं दादासाहेब.

सी.एम. : शुभारंभासाठी मोठा कार्यक्रम आयोजित करा. लोकांना बोलवा. मतदारसंघाच्या बाहेर पडलं पाहिजे तुम्ही. फक्त मुंबईचे नाही तर राज्याचे मंत्री आहात हे विसरू नका.

अण्णा : घेतो साहेब कार्यक्रम... आणि मला असं वाटतं...

सी.एम. : काय ?

अण्णा : (हात जोडत) समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून आपण यावं.

सी.एम. : (राजकीय हसू हसत) त्या दृष्टीनं बोलत नव्हतो मी पण तुमची इच्छा असेल तर जरूर येऊ. (मनगटावरील घड्याळात पाहतात आणि अण्णासाहेबांकडे कटाक्ष टाकतात. त्यांचे मनोगत उमजून अण्णासाहेब उठतात आणि हात जोडून नमस्कार करून निघून जातात. सी.एम. टेबलावरील पेपरवेट फिरवतात. गरगर फिरणारा पेपरवेट दिसतो.

7. **संध्याकाळ.**

(सी.ओं.चे दालन. एक फाईल पाहत ते त्रासिकपणे सही करतात. दरवाजा उघडल्याचा आवाज येतो. ते मान वर करून पाहतात. चंद्रा उभी.)

सी.ओ. : काय ?

चंद्रा : ते आलेत साहेब.

सी.ओ. : कोण ?

चंद्रा : दाबके, डायवर...(बाबूचे नाव घेण्याचे टाळते)

सी.ओ. : अच्छा, बोलव. (चंद्रा आतूनच दरवाजा ओढून धरत बाहेर मान काढते)

चंद्रा : या ऽऽऽ (दाबके, बिहारी आणि बाबू ह्या क्रमाने तिघेही आत येतात. बाबू आत येताना चंद्राकडे एक जळजळीत कटाक्ष टाकतो पण चंद्रा त्याला महत्व न देता बाहेर येते.)

सी.ओ. : आपल्या बागेतला उंट मरून वर्ष होत आलं, माहिताय तुम्हाला... दुसरा उंट आणायचाय. ती जबाबदारी तुमच्यावर टाकतोय मी. (वाक्यागणिक तिघांचेही असहाय, दडपणग्रस्त चेहेरे दिसतात.) दाबके ऽऽऽ

दाबके : येस सर ?

सी.ओ. : (पत्र देत) हे पत्र. (दाबके झटकन पुढे होऊन पत्र घेतो) बिकानेरला 'कॅमल रिसर्च सेंटर' आहे. तिथल्या प्रोजेक्ट ऑफिसरला नेऊन द्यायचं. व्यास नाव आहे त्यांचं. फोनवर बोललोय मी त्यांच्याशी, समजलं ? (दाबकेला पूर्णपणे समजलेलं नाही तरीही तो दडपणाखाली होकारार्थी मान हलवतो.) ते सगळी मदत करणार आहेत काय ?

दाबके : (झुकत) जी सर.

सी.ओ. : उंट ऑलरेडी तयार ठेवलाय त्यांनी. जहांगीर नाव आहे त्याचं - काय ?

दाबके : जहांगीर.

ü

सी.ओ. : तुम्ही क्लार्क आहात. ह्या दोघांपेक्षा वरचे. जास्त जबाबदारी तुमची आहे. बिकानेरला कसं जायचं माहिताय ना ? समजलं ?

दाबके : (माहित नाही, तरीही) जी सर.

सी.ओ. : निघताना अकाऊटंटकडनं डिझेलसाठी आणि इतर खर्चासाठी पैसे घ्या.

दाबके : जी सर.

सी.ओ. : उंटाची काळजी कशी घ्यायची तुम्हाला माहीत आहे, पूर्वी ठोंबरेला मदत करायचात तुम्ही ?

दाबके : जी सर...

दाबके : साहेब...

सी.ओ. : आता काय ?

दाबके : बिहारीची तब्बेत ठीक नाही. इतक्या लांबचा पल्ला. उंटाची जबाबदारी मोठी हाय म्हणून विचारलं ...

सी.ओ. : (अधिकाराच्या मस्तीत बिहारीला) क्या बिहारी, तेरा कुछ प्रॉब्लेम है क्या ?

बिहारी : (बेफिकीरीने) मेरी कुछ अडचन नाही साब. मै सब निपट लूंगा... यंहासे वडोदरा, अहमदाबाद, उदयपूर... चार दिन जाने के, चार आने के...

सी.ओ. : (दाबकेला पेचात पकडत) तुम्हाला प्रमोशन देऊन एक वर्ष झालं पण मनोवृत्ती बदलत नाही अजून!

दाबके : नाही साहेब... तसं नाही...

सीओ : जास्त शहाणपणा करू नका नाहीतर कन्फर्म होणार नाही. रिव्हर्ट करून पुन्हा शिपाई करीन...

दाबके : (थरथरत, हात जोडून) चुकलं साहेब. . .

सीओ : (पुन्हा मूळ विषयावर) बाबूला हाताशी दिलंय तुमच्या. हवं नको ते बघील तो सर्व. काय बाबू ?

बाबू : (हात जोडत) जी व्हय. पन सायेब. . .

सीओ : काय ?

बाबू : आजून रोजंदारी चालू हाय. . .

सीओ : पुन्हा तेच ? कधी सुधारणार रे तुम्ही लोक... करा अजून थोडे दिवस... आणि आता भलत्या वेळी विषय काढू नका तो. उंट आणलात की, तुला आणि बिहारीला कायम करण्याचा विचार करीन मी.

बाबू : (हात जोडत) मेहेरबानी साहेब.

सीओ : या आता.(तिघेही हात जोडतात. बाबू खोकतो. मोठी उबळ. उबळ दाबत तो बाहेर येतो. वेदनांनी वेडावाकडा झालेला पण बेफिकीर असा त्याचा चेहेरा दिसतो.)

8. (संध्याकाळ.
एक <u>दोहा</u> ऐकू येत आहे. चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची वसाहत. शिस्तीत बांधलेल्या

ü

छोट्या-छोट्या 8-10 चाळी. एकेका चाळीत दहा-दहा बिऱ्हाडं. बाहेर छोटं मैदान. लहान-मोठी झाडं. चाळी समोरा-समोर. मधोमध छोटा रस्ता. बाहेर पाण्याचे नळ. ओटे. झाडाला एखादी गाय-बकरी बांधलेली. एका बोळातून अचानक काही कोंबड्या क्लाऽऽऽ क्लाऽऽऽ करत पळत जातात. झपाझप पावले टाकत दाबके बिहारीच्या खोलीकडे येत आहे.

बिहारीची छोटीशी खोली. बिहारी हा पोट-भाडेकरू. एकटा राहणारा. दाबकेनं आपल्या ओळखीनं त्याला ही खोली मिळवून दिली आहे. त्याची खोली कॉर्नरला, तेथून मैदान दिसते. लाकडी खाट. त्यावर काही गोधड्या. जमिनीवर चटई अंथरलेली. एका कोपऱ्यात चूल. स्टोव्ह. काही भांडी. एका तिवईवर एकावर एक अशी पाण्याने भरलेली दोन मडकी.

(बिहारी चटईवर बसलाय. सोबतीला बाबू. तो गांजा मळतोय. मळता मळता वेड्यावाकड्या सुरात पण मनापासून दोहा म्हणतोय. एका रिकाम्या डब्यावर बाबू त्याला वेडीवाकडी साथ देतोय. गांजा मळून झाल्यावर बिहारी दोहा थांबवतो. गांजा चिलमीत भरतो. वर काथ्याची गुंडी ठेवतो. चिलमीला छापी गुंडाळतो आणि बाबूला संकेत करत ओठाजवळ नेतो. बाबू तिथंच पडलेली काडेपेटी उचलतो. दोन काड्या एकत्र करून झर्कन पेटवतो आणि चिलमीच्या तोंडावर ठेवतो. गालाचे फुगे आत बाहेर करत बिहारी एक मोठा दम मारतो. त्याच्या नाकातोंडातून धूर बाहेर पडतो. फ्रेमभर धूरच धूर. जणू धुरात सारं जग हरवून गेलंय. त्या धुरातूनच तो समोर पाहतो तर दरवाजात दाबके उभा.)

बिहारी : आ जा साले... आ ... बैठ ... क्या खुष खबरी ? (चेष्टेच्या सुरात हसतो)

दाबके : (खाटेवर बसून त्राग्याने) माझी साल्यानो तंगडतोड चाललीय आणि तुम्ही इकडं मजा
मारत बसलाय…

बाबू : कसली तंगडतोड चाललीय ?

दाबके : ट्रकची व्यवस्था बघायला नको ? खरं म्हणजे हे ड्रायव्हरचं काम...

बिहारी : (लक्षात येतं) अरे यार तू चिंता करना छोड दे. कुछ नही होता…

दाबके : (उपरोधाने) जास्त जबाबदारी माझी आहे ना, मग मलाच ती
पार पाडावी लागणार. बिकानेर किती लांब आहे माहिती आहे का तुला ? आठ दिवसात उंट आणायचाय.

बिहारी : आठ दिनमें तो मैं तुझे पुरी दुनिया घुमा के ला सकता हूं... (हसतो) क्या बाबू ?

बाबू : ही चेष्टा करायची गोष्ट न्हाय. माग बागेतलं खोकड मेलं तर सायबानी ठोंबरेला नोकरीवरनं काढून टाकलं होतं... आठवतंय ना ?

बिहारी : (खिजवत) तू नोकरी की फिकर मत कर... जबतक चंद्रा है…

बाबू : (चिडत) बिहारी ऽऽऽ

दाबके : झाली साल्यांची परत भांडणं सुरू.

ü

बिहारी : (बाबूला चिलीम देत) ले... अरे ले ले... यार... दम मार, सब भूल जाएगा...

बाबू : (रागातच चिलीम घेतो...जोरदार दम मारून नाकातोंडातून धूर काढतो. त्याचा एकदम उद्रेक होतो.) रंडी साऽऽऽली... छिनालऽऽऽ (संगीत.)

दाबके : (त्याच्या पाठीवर थोपटत) जाऊ दे रे-कशाला उगाच त्रास करून घेतोस जीवाला ?

बाबू : तुला सांगतो दाबके, तू कारकून. आमच्यापेक्षा वरच्या दर्जाचा... पण आमच्यात मिसळतोस. आमचा वाटतोस. आणि ती नमकहराम साली. बायको असून पन कधी जवळची वाटली न्हाय...

बिहारी : जाने दो यार...भगवान के वास्ते...

बाबू : तुझं नशीब चांगलं... शादी का लफडा नहीं...(हसतो)
(बिहारीचा गूढ-विषण्ण चेहेरा दिसतो. त्याच्या मनात जणू भूतकाळातील आठवणींचं रसायन उकळतंय. त्याचं प्रतीक म्हणून 2 ते 3 सेकंदांची एक विशिष्ट ट्यून ऐकू येते. बाबू आपल्याच दु:खात. चिलमीचा आणखी एक दम मारतो. दाबके उठून कोपऱ्यात जातो. मडक्यातले पाणी पितो.

दाबके : चला उठा आता.

बिहारी : क्या बोलता !

दाबके : दुसरं काय ? चला माझ्याबरोबर... गाडीची सर्व्हीसिंग झालीय का बघू ...काय दुरुस्ती असली तर करून टाकू...सकाळी निघायचंय...

बिहारी : चालते है, चलते है... चल एक दम मान... (चिलीम दाबकेकडे करतो ले... ले.. चल... (हसतो)

दाबके : नको... नको ...भलतच काहीतरी...

बाबू : घे...घे...एकदा तरी वढून बघ !

दाबके : छे...छे ... नको... काहीतरीच. (दोघेही त्याची मस्करी करत हसतात.)

बिहारी : हट्. गांडू साला ! (म्हणत चिलीम तोंडाला लावतो आणि धुराचा ढग बाहेर काढतो.)

9. (**सकाळ**.
बिकानेर येथील उंट संशोधन संस्था. संस्थेच्या आवारात तयार करण्यात आलेल्या एका उंचवट्यावरून पाच सहा कर्मचारी उंट ट्रकात घालीत आहेत. बिहारी आणि दाबकेही त्यांच्यात. प्रॉजेक्ट ऑफिसर व्यास दूर, कार्यालयाच्या दारातून नजर ठेवून उभे आहेत. कर्मचारी उंटाच्या पायाला दोरखंड बांधून ट्रकच्या लाकडी भिंतीला बांधतात. त्याची वेसण तिथल्याच एका फळीला बांधून हात झटकत खाली उतरतात. बाबू ड्रायव्हरच्या पाठीशी असणाऱ्या भिंतीला, चौकोनी खिडकीजवळ टेकून उभा राहतो.)

दाबके : हो गया ? (असे तिथल्या एका कर्मचाऱ्याला विचारतो. तो `जी, हो गया` असे उत्तर देत एक कागद पुढे करतो त्यावर दाबके कागदावर सही करून तो तेथील एका कर्मचाऱ्याला देतो. आत चढतो.)

ü

एक : और ये सामान-उंट पर बैठने के वास्ते - ये उसका साज (असे म्हणत खोगीर आणि तत्सम सामान उंटाला सजवण्याचे कपडे आत ठेऊन उतरतो. (बिहारी ड्रायव्हर साईडने येऊन आत बसतो. दरवाजा लावतो.)

दोन : संभलके लई जाणा भईयो…और सुणो, उंट पठाके को डरता है, इसलिए पठाकेसे दूर रखना उसे…समझे क्या?

बिहारी : अच्छा…अच्छा…ठीक है. समझ गये. (असे म्हणत ट्रक स्टार्ट करतो. श्री.व्यास यांच्या खांद्यावरून कॅमेरा चित्रण करतो. हळूहळू ट्रक संस्थेच्या आवाराच्या बाहेर पडतो.)

संस्थेच्या आवारातून ट्रक बाहेर पडून रस्त्याला लागतो. बाबू आणि दाबके दोघेही एका अंतस्थ प्रेरणेने हात जोडून परमेश्वराची प्रार्थना करतात. आधी दाबकेचा आणि नंतर बाबूचा चेहेरा दिसतो. बिहारी दाबकेकडे पाहून गालातल्या गालात हसत शैलीदारपणे गिअर बदलत ट्रकला गती देतो. ट्रक नीट रस्त्याला लागतो. गाडीच्या लयीबरोबर हलणारी उंटाची मान दिसते. त्यावरून कॅमेरा त्याच्या तोंडावर जातो. फ्रेमभर उंटाचे तोंड दिसते. त्याची मान हलत आहे. गळ्यातल्या घंटा वाजताहेत...

बिहारी : यार दाबकेऽऽऽ

दाबके : काय ?

बिहारी : बाबू को बुला लेते है आगे !

दाबके : पण तो उंटावर लक्ष ठेवायला बसलाय मागं.

बिहारी : कितनी देर धूप मे बैठेगा बेचारा...

दाबके : (त्या चौकोनी खिडकीत तोंड घालून हाक मारतो) बाबू ऽऽऽ ए ऽऽऽ बाबूऽऽऽ

बाबू : (खाली बसलेला उठून उभा राहत) काय रे काय झालं ?

दाबके : बिहारी बोलवतोय तुला, ये पुढं...

बाबू : आरं पन मग उंटावर लक्ष कोन ठिवील ?

बिहारी : (खिडकीतून डोकावून ओरडत) अरे कुछ नही होगा. आ जा आगे... आ जा किन्नरसाईडसे... (बोलण्याच्या नादात त्याचा ट्रक रस्त्याच्या खाली उतरण्याच्या बेतात असतो. पण बिहारी कौशल्यानं तो सावरतो. दाबकेच्या तोंडून भितीने 'अरे... अरे'... असा उद्गार बाहेर पडतो. पुन्हा तोच प्रयोग नको म्हणून बाबूला 'ये पुढं'
असं निर्वाणीच्या सुरात सांगतो. ट्रक चालू असतानाच बाबू वरून क्लिनर साईडने खाली उतरण्याचा प्रयत्न करतो. पाय, धड, मुंडी या क्रमाने अखेर तो खाली येऊन आत बसतो.)

बाबू : (बिहारीला) काय रे कशाला बोलावलंस ?

बिहारी : झक् मारने को…(बंडीतून बिडीबंडल माचीस काढून देत) ले जलाव... बाबू एक विडी पेटवून बिहारीला देतो. दुसरी आपण ओढू लागतो. मध्ये बसलेला दाबके आलटून-पालटून त्यांच्या हालचाली पाहत आहे. संगीत.)

ü

बिहारी : कितनी तारीख को है प्रोग्रॅम ?

दाबके : (घड्याळात तारीख पाहत) चौदा.

बिहारी : मतलब कितने दिन है हमारे पास ?

दाबके : पाच दिवस.

बिहारी : (स्मीत करीत) बहोत हो गये. आते समय तीन दिन मे आये हम लोग.

दाबके : मगर अब उंट है साथ मे. दो दिन पहले पंहुचना है...

बिहारी : वो छोड दो मुझपर तूम अभी और तुम्हारी वो कहानी सुनाव...

दाबके : कहानी ?

बिहारी : (हसू दाबीत) अरे वो... लडकीवाली...

बाबू : (रंगात येत) आरं हां... ती... सांग सांग... तू मुलगी बघायला गेला नव्हतास का, ती !

दाबके : (त्या आठवणीने दाबकेही एकदम हसायला लागतो. हसता हसता गंभीर होत)... खरं
म्हणजे माझ्यासारख्या अशा बावळट माणसानं मुलगी बघायला जाणं हा एक मूर्खपणाच होता. पण मी तो केला... (बिहारी व बाबू हसतात) मुलगी बघण्याचा कार्यक्रम वगैरे व्यवस्थित झाला. मी तिला पसंतसुद्धा केली. पण दुसऱ्या दिवशी तिचा भाऊ निरोप घेऊन आला.

बाबू : काय ?

दाबके : ..क़ी मुलीला तुमी पसंत नाय. (बिहारी व बाबू हसतात.)

बिहारी : (हसता हसता) फिर ? आगे क्या हुवा ?

दाबके : (त्या आठवणीत हरवत) मी ठरवलं, आपण तिला पसंत का नाही हे स्वत:च जाऊन तिला विचारायचं...
(ट्रकला एक जम्प बसतो. <u>इंटरकट्.</u> सकाळ.)
मोडकळीला आलेल्या, एका डुगडुगत्या जिन्यावरून दाबके वर चढत आहे. तस तसा कॅमेरा वर जात आहे. जिन्याच्या टोकाशी असणाऱ्या खोलीचे दार बंद. दाराबाहेर वरून खाली लोंबकळणारी गंजलेली कडी. दाबके कडीचा 'खड्खड्' असा आवाज करतो. काही क्षणानी 'कर्रऽऽऽ' असा आवाज करत दरवाजा अर्धवट उघडला जातो. त्यातून एक मुलगी मान बाहेर काढते. परकर-पोलक्यातली शाळकरी मुलगी. भरपूर तेल लावून तिने मधोमध भांग पाडलेला आहे. दोन वेण्या मधोमध दुमडून केसाच्या बुंध्याशी बांधलेल्या आहेत. तिथं लालभडक रिबिनींची फुले... अतिशय सुंदर मुलगी. कॅमेरा तिच्या ॲन्गलने पाहतो. दाबकेच्या आधीच कुरूप असणाऱ्या चेहेऱ्यावर अंधार आल्याने तो भुतासारखा दिसत आहे. कमालीचा त्रासिक चेहेरा करून )

मुलगी : काऽऽऽय हवंय ?

दाबके : नाही, म्हणजे. मी तुम्हाला का पसंत नाही ते विचारायला आलो होतो...

मुलगी : (वस्कन अंगावर येत) तुम्ही माकडतोंडे आहात म्हणून... (खाड्कन दरवाजा

ü

लावून
घेते. इंटरकट संपतो. तिघेही मोठ्याने हसताहेत)

दाबके : इतकंच करून मी थांबलो नाही (पॉज) तर नंतर पत्र पाठवून मी तिचे आणि तिच्या घरातल्या सर्वांचे आभार मानले... (तिघेही आणखीनच मोठ्याने हसू लागतात. हसता हसता दाबकेच्या डोळ्यात पाणी येतं. त्याचा स्वर अवरुद्ध होतो... घसा खाकरून बोलण्याचा प्रयत्न करतो. त्याची वेदना शब्दातून जाणवते) आयुष्यात बघितलेली ती पहिली आणि शेवटची मुलगी. नंतर तो बावळटपणा पुन्हा केला नाही, (रुमालाने नाक पुसतो. आता सारे गंभीर झालेले. डोळे टिपतो. ड्रायव्हर केबीन मावळणाऱ्या सूर्यावर डिझॉल्व होते.)

10. (कंटाळवाण्या खडतर प्रवासाची एक मालिका. थीम म्युझिक अखंड सुरू)

1 दुपार. घाटातले एक अवघड वळण. टॉप ॲन्गल. उंटाची सावली ट्रकमध्ये पडलेली आहे. ट्रक हळू हळू वळण घेतो. दाबके बाबू पेंगताहेत. बिहारी स्वत:च विडी पेटवण्याचा प्रयत्न करीत आहे. त्या प्रयत्नात ट्रक भलतीकडेच जाऊ लागतो. बिहारी "हॅट साला..." म्हणत पुन्हा ट्रक मार्गावर आणतो.

2 उंटाच्या मागून ट्रकचा पाठलाग करत कॅमेरा चित्रिकरण करतो. उंटाच्या मानेवरून समोरचे चित्रण करतो... रस्ता झपाझप मागे पडत आहे.

3 कॅमेरा विंडस्क्रीनमधून ड्रायव्हरच्या अँगलनी पाहतो. समोर दूर क्षितीजापर्यंत रस्ता पोहोचलेला. त्या विशिष्ट क्षितीजरेषेशी पोहोचेपर्यंत हळूहळू रस्ता अंधारात जाताना दिसतो.

4 ड्रायव्हर केबीन. दाबके, बाबू पेंगताहेत. बिहारी तारवटलेल्या डोळ्यानी ट्रक चालवतो आहे.

5 रात्र. विस्तीर्ण वालुकामय पठार. मधोमध रस्ता. दोन दिवे वेगाने कॅमेऱ्याकडे येत आहेत. एक प्रवासी गाडी  समोरून येऊन निघून जाते.

6 गडद अंधार. ट्रकचा रोंऽऽऽ रोंऽऽऽ आवाज. मागचे लालभडक दिवे क्लोज-अप मध्ये दिसतात. कॅमेरा तेथेच उभा. ट्रक हळूहळू पुढे निघून दिसेनासा होतो.

7 एका डोंगराच्या पायथ्याशी असणाऱ्या एका अपरिचित ढाब्याशी ट्रक उभा. तिघेही ट्रकजवळ उभे राहून ग्लासातून चहा घेत आहेत. आता त्यांचे डोळे तांबारलेले. दाढ्या वाढलेल्या. कपडे खराब झालेले.

रात्र होऊ लागली आहे. राजस्तानच्या बॉर्डरवरची एक छोटीशी वस्ती. हायवेला लागून एक छोटी टपरी आणि टपरीच्या मागे दहा-वीस घरे. एका घराच्या अंगणात काही गावकरी - बायका - मुलं जमलेली. गॅसबत्तीचा भगभगीत उजेड.

बिहारी ट्रक साईडला घेतो. तिघेही उतरतात. टपरीच्या बाजूला असणाऱ्या बाकड्यावर बसतात. तोंडावर पाणी मारतात. चहा घेता घेता ते तिकडे अंगणात सुरू असलेला कार्यक्रम पाहत आहेत.

त्या वस्तीवर एक उंटीण नुकतीच व्यायलेली आहे. तो आनंद व्यक्त

ü

करण्यासाठी सारे जमलेले आहेत. गायक एक पारंपरिक लोकगीत म्हणत आहे. पारंपरिक वाद्ये वाजत आहेत. मधूनच उंटीणीचे दूध पिणारे पिल्लू दिसते. (ट्रकातील उंटाची रिॲक्शन) प्रभावी लोकगीत सुरू आहे. डोक्यात भिनणारे संगीत.

दाबके मधूनच घड्याळाकडे पाहतो. त्याचा चेहेरा चिंताग्रस्त. तो बिहारीकडे पाहतो. निघायला पाहिजे हे बिहारीला कळते. तो उठतो. बाबू उठतो. सारे ट्रकात बसतात. ती वस्ती हळू हळू मागे पडत जाते. संगीत मात्र अजूनही त्यांच्या सोबतच येत आहे.

11. रस्ता.

हळू हळू पहाट होत आहे. रस्ता उजळू लागला आहे. कॅमेरा बिहारीच्या अँगलनें पाहतो. रस्ता हळू हळू मागे पडत आहे. बाबू आणि दाबके पेंगता पेंगता तसेच झोपले आहेत. बिहारी नेटाने झोप टाळण्याचा प्रयत्न करीत आहे. झापड यावी तशा त्याच्या पापण्या जड होऊन दोन तीनदा मिटतात. प्रयासाने तो स्वत:ला सावरत ट्रक चालवत आहे. पुन्हा त्याच्या डोळ्यावर झापड येते. तो क्षणभर डोळे मिटतो. पुन्हा उघडतो. समोरच्या काचेतून आता त्याचा कडवट भूतकाळच जणू आत येतो. (संगीत.)

फ्लॅश बॅक.

संध्याकाळ.

बिहारीचे गाव/घर. मावळणाऱ्या क्षितीजावरचा पडदाभर सूर्य. त्यावर सुपरइंपोज झालेला सळसळणारा गर्द पिंपळ. त्यातून सैनिकी गणवेशातील बिहारी झपाझप कॅमेऱ्याकडे येत आहे. त्याच्या हातात पत्र्याची एक ट्रंक. खांद्याला पिशवी अडकवलेली. सुटीत पत्नीच्या ओढीने तो घरी निघालेला आहे. पावला-पावलागणिक आनंदाने उचंबळून येणारा त्याचा चेहेरा दिसतो. (संगीत.) आजु-बाजूला शेतीत काम करणारे लोक. गुराखी. विहीरीवर कपडे धुणाऱ्या बाया. खेळणारी मुलं...गाई-गुरे, कुत्री-कोंबड्या इ.)

कॅमेरा बिहारीच्या मागून त्याच्याच गतीने पुढे सरकत आहे. नजरेच्या टप्प्यात एक टुमदार घर. घरापुढे अंगण. अंगणातून आत गेले की ओटी. ओटीच्या आत माजघर. घराजवळ आल्यानंतर बिहारी हलक्या पावलानी अंगणात येतो. अलगद ओटीवर ट्रंक ठेवतो. खांद्याची पिशवी काढून ठेवतो. पत्नीला आश्चर्याचा सुखद धक्का द्यावा असा विचार त्याच्या मनात असतो. हळूच तो माजघराचे दार ढकलतो आणि आत येतो.

अंधारे माजघर.

एका भिंतीला वरच्या बाजूला एक मोठी लाकडी पट्टयांची खिडकी. तिच्यातून प्रकाश आत येत आहे. खाली एक खाट. बिहारीच्या पत्नीचे मोकळे केस

ü

खाटेखाली लोंबताहेत. खाटेवर बिहारीची पत्नी एका पुरुषाच्या बाहुपाशात पडलेली. दोघेही विवस्त्र. बिहारी दु:खातिरेकाने आपले तोंड ओंजळीत लपवतो. त्याची चाहूल लागल्यामुळे पुरुष सावध होतो. चमकून बिहारीकडे पाहतो.
बिहारीचा क्लोजअप्. त्याच्या मस्ताकावरची घमनी संतापाने टरारून फुगली आहे. एव्हाना बिहारीच्या पत्नीला वस्तुस्थितीची कल्पना येते ती चट्कन उठून बसते. शेजारी पडलेले पातळ उचलून छातीशी धरते. भेदरलेल्या नजरेने बिहारीकडे पाहते. तिचा चेहेरा पाहून बिहारीचा संताप शिगेला पोहोचतो. त्याला कोपऱ्यात ठेवलेली कुऱ्हाड दिसते. तो चट्कन कुऱ्हाड उचलतो आणि क्षणार्धात पुरुषाच्या मानेवर घालतो. पुरुष तडफडू लागतो. बिहारीची पत्नी एक हात पुढे करून 'नको नको' असे सुचवत असते परंतु बिहारी कठोरपणे दुसरा घाव तिच्या मानेवर घालतो. तिची अर्धवट तुटलेली मान तिच्या धडावर लोंबकळू लागते. क्षमायाचना करणारे तिचे डोळे उघडेच राहिलेले आहेत.

बिहारी भानावर येतो. भेलकांडत ओटीवर येतो. त्याच्या गणवेषावर उडालेली रक्ताची चिळकांडी दिसते. तो हाताने ते रक्त पुसण्याचा प्रयत्न करतो पण ते अधिकच पसरले जाते.
फ्लॅश बॅक संपतो.

12. बिहारीचे डोळे उघडतात. विंडस्क्रिनमध्ये त्याला पत्नीचे अखेरच्या क्षणीचे डोळे दिसतात आणि तो क्रूद्धपणे ओरडतो.

बिहारी : नमक हराम, रंडी सालीऽऽऽ
(त्याचक्षणी ट्रक रस्ता सोडून डोंगराच्या बाजूला जाऊन दरडीवर आपटतो आणि बंद पडतो. दाबके आणि बाबू दोघेही शॉक बसल्यासारखे जागे होऊन 'काय झालं ? काय झालं ?' असं विचारतात. बिहारी अजून पूर्णपणे सावध झालेला नाही. तो आपला राग आणखी उपसून बाहेर काढतो.)

बिहारी : हरामजादो, खूद सोते हो और मुझेही पुछते हो ? उंट ले जाने की जिम्मेदारी क्या सिर्फ मेरी है ? मैं भी अगर सो जाऊ तो गाडी कौन चलाएगा तुम्हारा बाप ? क्या समझ रख्खा है तुमने मुझको ? तुम्हारे बाप का नौकर हूं क्या मै ? क्यू नाही सांतीसे मुझे जिने देते, क्यूं नाही, क्यूं ? (मान हलवत अगतिकपणे स्टिअरिंग व्हीलवर डोके टाकून पडून राहतो. संगीत.)

13. (झाल्या प्रकाराने बाबू हादरलेला. तो कानोसा घेत वर येतो. उंट जोराने ओरडतोय. पाय आपटतोय. बाबू जीवाच्या आकांताने ट्रकवर चढतो. पाहतो तर उंटाचे मागचे पाय सुटलेले. तो बिथरलेला आहे. थयथयाट करीत आहे. त्याच्या नाकपुड्या थरथरत असतात. गळ्यातील घंटा वेड्यावाकड्या झुलत वाजत असतात. बाबूला पाहून उंट थुंकतो. बाबू खिडकीतून दाबकेला...)

बाबू : दाबकेऽऽऽ उंट सुटलायऽऽऽ (दाबकेही जीवाच्या आकांताने वर येतो. त्याला पाहून उंट अधिकच थयथयाट करु लागतो. दोघेही दोरखंड हातात घेऊन त्याचे सुटलेले दोन्ही पाय कसोशीने बांधू पाहतात. उंट ऐकत नाही. त्याची एक लाथ बाबूला बसते. बाबू कळवळतो. तो आता दाबकेवर थुंकतो. अखेर ते त्याला बांधण्यात यशस्वी होतात. आणि अवसान गळाल्याप्रमाणे उंटाच्या पायाशी बसतात. बाबू हात जोडत देवाची प्रार्थना करतो. कुणीतरी जवळचे माणूस मरावे

ü

त्याप्रमाणे तो अश्रू ढाळू  लागतो.)

14 . (काही क्षणांनी बिहारी भानावर येतो. दरवाजात लटकवलेली पाण्याची पिशवी काढून तोंडावर पाणी मारतो. शेजारी पाहतो तर कोणीही नाही. त्यांना शोधू लागतो.)

बिहारी : कहा हो रे तुम लोग ? बाबूऽऽऽ  दाबकेऽऽऽ क्या हुवा ? (असं म्हणत वरती येतो. पुढचे दृष्य ट्रकच्या आत चित्रित होते. ते दोघेही तसेच निश्चल बसलेले. बाबू, दाबकेच्या जवळ जातो. बाबूच्या डोळ्यातून अश्रू ओघळताना दिसतात. बिहारी चरकतो. बाबूच्या पाठीवरून हात फिरवत.)

बिहारी : क्या हुवा रे ? क्या हुवा ? ए बाबूऽऽऽ… क्यों रो रहा है तू ? क्या हुवा दाबके ? बोलो ना यार… बोलते क्यूं नही तुम लोग ? (दोघेही निपचित, वाचा बसल्यासारखे.  शांत, बिहारीला आपली चूक उमगते. तोही अस्वस्थ.)

बिहारी : हां मेरीही गलती है. मेरीही… मगर क्या करू ? वो आयी ना… मेरा पिछा कर रही है जिंदगीभर… हरामजादी साली…

दाबके : कोण आली ? काय बोलतोस तू ?

बिहारी : दुसरी कौन, बिवी मेरी !

दाबके : क्यू खालीपिली नाटक कर रहा है ?

बिहारी : नहीं यार दाबके. सच बोल रहा हूं. कसम से… (दोघेही त्याच्याकडे आश्चर्याने पाहू लागतात) मेरी शादी हुई थी… मिल्ट्रि मे ड्रायव्हर था मै… एक बार छुटी पे वापस आया. देखा तो मेरी बिवी किसी दुसरे के के बाहो मे पडी हुई… फिर दोनो को खत्म कर दिया मैने… और भागता रहा… भागता रहा, घर छोडके… गाव छोड के… पागल हो गया था मैं… खुद को मिसफिट करके चला आया वापस… चलते चलते - भागते भागते इधर आया… किसीकोभी मालूम नहीं मेरी कहानी… पेट के वास्ते मुन्शीपाल्टीमें लोगों का मैला उठाने का काम करने लगा. मैला उठाते उठाते झाडूवाला बना, फिर क्लिनर बना… ड्रायवरभी बन गया एक दिन…मगर कभी चैन की निंद नहीं ले सका. डर था मन में…डरता था पहले पुलिस को… आज आयेगी… कल… परसो… मगर नहीं… अब डरता हूं सी.ओ.को… अगर उसे पता लग जायेगा तो पकड के जेल भेजेगा मुझे. फिर रास्तेपे आ जाऊंगा… पागल हो जाऊं गा… इसलिए दिनरात काम करता हू… बिमारी की पर्वा नही करता… गांजा पिता हूं… भुलना चाहता हूं सब कुछ… (एकदम त्याला खोकल्याची उबळ येते. खोकता खोकता खाली बसतो. मरणाचे खोकतो. तोंडातून लाळ, डोळ्यातून पाणी गळू लागते. तो दोघेही त्याला जवळ घेऊन थोपटू लागतात. उंटाच्या डोळ्यातून आता पाणी येत आहे. त्याची सावली तिघांवर पडते. त्याच्या गळ्यातील घंटा वाजत राहतात.)

15 . (दुतर्फा भरगच्च झाडे वाढलेला रस्ता. झाडांनी रस्त्यावर टनेल तयार केलेले आहे. कॅमेरा लो अँगलने चित्रण करीत आहे. ट्रक दिसत नाही मात्र झपाझप मागे जाणारी झाडं आणि त्यावरचे आकाश दिसते. प्रसन्न संगीत. त्यावर खुशीची शीळ ऐकू येते. कॅमेरा बिहारीवर येतो. तो शीळ घालीत मजेने ट्रक चालवत आहे. ट्रकच्या विंडस्क्रीनवरून झाडांच्या मोहक सावल्या सरकताना दिसतात.)

ü

दाबके : यार बिहारी !

बिहारी : बोलो...

दाबके : बहुत खूष नजर आता है.

बिहारी : नही तो...

दाबके : क्या नहीं नहीं करता ? कुछ तो है…बोल...

बिहारी : (स्मीत करत) कुछ नाही, कसम से, (पुन्हा शीळ घालू लागतो. दोघेही त्याच्या त्या अकस्मात खुषीकडे, संशयाने पाहू लागतात.)

बाबू : परवा आला तसा काय झटका-बिटका तर न्हाय आला ना ह्याला ?

डाबके : मला पण तसंच वाटायला लागलंय आता.

बिहारी : (खळखळून हसत) नहीं यार नहीं... (बिडी बंडल माचीस काढतो. बाबूकडे देत) ले जलाव... (बाबू विडी पेटवण्याचा प्रयत्न करू लागतो. दाबके बिहारीकडे रोखून पाहत आहे. मधूनच बिहारी त्याच्याकडे एक कटाक्ष टाकतो व गालातल्या गालात हसत पुन्हा गाडी चालवू लागतो. येथे गाणे.)

दुपार.

सी.ओं.चे कार्यालय. सी.ओं. टेबलावरचा फोन फिरवत आहेत. फोन लागतो.

सी.ओ. : हॅलोऽऽऽ हॅलोऽऽऽ (थोडे थांबून) व्यासजी है क्या ?

व्यास : (फोनवर दिसतात. हे उदयपूर येथील प्रॉजेक्ट कॅमलचे प्रॉजेक्ट ऑफिसर. ते त्यांच्या कार्यालयात बसलेले. मागे राजस्तानचा मोठा नकाशा. त्यांच्या टेबलावर उंटाची एक छोटी प्रतिकृती आहे. त्या उंटाच्या प्रतिकृतीवरून हे दृश्य सुरू झालेले.) जी मै व्यास बोल रहा हूं... आप कौन बात कर रहे है जी ?

सी.ओ. : नमस्ते साब, मै महाराष्ट्र से धुलिया नगर पालिका कार्यालय से सीईओ साने बात कर रहा हूं

व्यास : हां.हां. साने जी. नमस्ते, ...आप का फोन आया था... खत भी मिला था आप का... (पुढे त्या दोघांचे बोलणे सुरू आहे. उंटासंबंधी त्यांची प्रश्नोत्तरे. प्रतिक्रिया... फक्त ओठ हलताना दिसतात... मागे संगीत वाजत आहे...)

16. **संध्याकाळ**. रस्ता.

समोरच्या टेकाडीवर टेकलेले आभाळ. ते हळूहळू जवळ येत असल्याचा आभास. कॅमेरा ट्रकच्या टायर जवळून चित्रण करीत आहे. तो टेकाडावर आल्यानंतर कॅमेऱ्याला पलिकडचे दिसते. खाली दूरवर एक छोटीसी वस्ती. त्या वस्तीच्या अलिकडे दोन चार घरांची एक छोटीसी वाडी. रस्त्याला सोडून थोडे आत गंगावतीची टपरी. टपरीवर विडी-तंबाखू माचीसपासून चहापर्यंत अनेक गोष्टी मिळतात. बाजूच्या घराजवळ दोन-चार झाडं. बाजूला एक गाय बांधलेली, उंडारणाऱ्या दोन-तीन बकऱ्या-कोंबड्या, हळूहळू ट्रक त्या टपरीजवळ येतो. टपरीच्या बाजूला दुसरी एक झोपडी. तिथे बाहेर खाट. त्यावर एक वृद्ध स्त्री बसून आहे. आजुबाजूला काय चाललंय हे तिला निटसं कळत नाही. ट्रक टपरीच्या दरवाजाशी समांतर लावून बिहारी मिष्कीलपणे भोंगा वाजवतो. एकदा-दोनदा-तिनदा. गंगावती बाहेर येते. चाळीशीची देखणी स्त्री. रासबिहारीची मैत्रीण. गव्हाळ

ü

नाकेली. चोळी-घागरा त्यालेली. अंगावर दागिने, पायात पैंजणे. उत्साही-आनंदी. बाहेर डोकावून पाहते. आधी संशयाने नंतर आश्चर्याने आणि आपुलकीने. बिहारी आल्याची तिची खात्री पटते. पट्कन ओढणी सावरत बाहेर येत...)

गंगावती : उई मा... रस्सो ? कही मै सपना तो नही देख रही ? (इकडून बिहारी झट्कन खाली उतरतो आणि धावत जाऊन तिला वर उचलून गोल फिरवत)

बिहारी : सपना वपना कुछ नाही... मै सच्ची मे आ गया हूं, देखो... (हसतो)

गंगावती : अरे हां हां बस कर अभी. (बिहारी तिला खाली ठेवतो. ती मूड बदलत) बोला था जल्दी आऊंगा, कहा गायब हुवा था दो महिनों से ? कितनी राह देखी तुम्हारी ?

बिहारी : (हतबलपणे) क्या करू... काम तो दिन ब् दिन बढताही जा रहा है... (एकदम तिला हाताला धरून ट्रकच्या दिशेने ओढत.) आव देखो, क्या माल भरके लाया हूं...

गंगावती : क्या लाया है ? (उंट आता बसलेला. त्यामुळे बिहारी गंगावतीला कमरेत धरून वर उचलतो आणि दाखवतो)

गंगावती : उई माऽऽऽ उंट ? (बिहारी हसत हसत तिला पुन्हा खाली ठेवतो) कही सर्कस वर्कस
मे तो नही ले जा रहा ?

बिहारी : नही नही... सीओ साबने मंगवाया है, बगीचेमे बच्चोंको खेलने के वास्ते...

गंगावती : अच्छा... अच्छा... (उंट उठून उभा राहतो आणि जोराने ओरडतो)

बिहारी : क्या हुवा रे तुझ को ? (असे उंटाला म्हणत केबीनमध्ये शिरून वरच्या फळीवरून एक पुडके काढतो. त्यात चोली-घागरा आणि मिठाईचा पुडा आहे. उडी मारून खाली उतरत त्या दोघांवर ओरडतो.) अरे वो गधो, अंदर बैठे बैठे क्या कर रहे हो ? उतरो निचे. (गंगावतीला) अपने दोस्त है. जा तू. पानी ले के आ हात मू धोने के लिए. (तिला थांबवत) और पकड...ये तेरे लिये...(ती पुडके घेते. दाबके व बाबू खाली उतरतात. गंगावती कौतुकाने पुडके पाहत बाजूच्या झोपडीत शिरते.)

बाबू : कोन रे ही ?

बिहारी : (डोळा मारत) कैसी है ?

दाबके : (भेदरलेला) नसत्या लफड्यात पडू नको बिहारी. आपल्याला लवकर पोहोचायचय.
साहेब वाट बघत असंल.

बिहारी : अरे यार लफडा-वफडा कुछ नही. अपनाही घर है ये. रात यही काटेंगे, आराम करेंगे, सुबे होते ही चले जाएंगे... क्या ? (दाबके संभ्रमात पडून बिहारीकडे पाहतोय)

बिहारी : और सून, उंट को भी छोडेंगे यहा, थोडा समय. उसको भी अच्छा लगेगा, क्या ? (गंगावती बादली तांब्या घेऊन येते.)

दाबके : उंट सोडायचा ? डोकं फिरलंय का तुझं ?

बाबू : नाय तं काय ?
(रासबिहारी ट्रकच्या मागचा फाळका पाडतो. गंगावतीच्या घरासमोरील एका खाटेचा आधार त्या फाळक्याला देतो, ट्रकात शिरून दोर सोडत उंटाला खाली उतरवतो आणि खाली आणून झोपडीच्या बाजूला असणाऱ्या झाडाला बांधतो.

ü

पाठोपाठ ट्रकात चढून भुशाचे पोते आणतो आणि उघडून उंटासमोर ठेवतो. उंट खाऊ लागतो.

गंगावती : (तांब्या बिहारीला देते. बिहारी ओंजळभर पाणी सप्कन तोंडावर मारतो.)

17. (चांदणी रात्र.
अंगण. झाडाच्या पानांतून चंद्र दिसतो. गंगावतीच्या घरासमोर अंगणात सर्वजण जेवत बसले आहेत. उंट शेजारच्या झाडाला बांधलेला. उंटावरून कॅमेरा अंगणात येतो. दारूच्या रिकाम्या बाटल्या, ग्लास पडलेले दिसतात. दाबके दारू पीत नाही. बिहारीचे जेवण झाले आहे. तो तांब्या उचलतो आणि घटाघटा पाणी पिऊन खाली ठेवतो. तृप्त...)

गंगावती : और दूं क्या थोडी रोटी ?

बिहारी : नही, नही... पेट भर गया... सच्ची. (ताटातच हात धुताधुता दाबकेला) दाबके ?

दाबके : नको... माझंही पोट भरलं.

बिहारी : और बाबू तुझे ? (बाबूला खूप चढलेय. तो जवळ जवळ लॉस्ट झालेला. झिंगतोय. तोही ताटात हात धुतोय. बिहारी त्याला परत विचारतो)

बिहारी : क्या पूछता मै बाबू ?

बाबू (एकदम चमकून भानावर येत... आपल्याला चढलेली नाही असं भासवत) काय ?

बिहारी : रोटी चाहिये क्या ?

बाबू : नको, नको... नको (बिहारी हसत सर्वांना) इतनी सी पिली तो चढ गयी साले को... नशा करता है 'गांडू' कही का... (हसतो.)

बाबू : देख बिहारी, अपुनको 'गांडू' नाही बोलने का, समझा क्या ? मर्द का बच्चा है साला आपून (छाती ठोकत-झुलत) मर्द... मर्द का बच्चा है अपुन !

बिहारी : हां... हां... मालूम है, मालूम है…(गंगावतीला) बच्चा नही होता इसलिए इसकी बिवी सीओ साबके पास जाने लगी है. क्यूं दाबके ? (कुचेष्टेने हसतो) (बाबूचा एकदम उद्रेक होतो, तो बिहारीच्या अंगावर धावून जातो. बिहारीला लोळवत)

बाबू : साले बिहारीके बच्चे... अब मै तुझे जिंदा नही छोडूंगा. (दाबके आणि गंगावती त्याना
सोडवण्याचा प्रयत्न करतात.)

दाबके : अरे…अरे…अरे…

गंगावती : अरे अरे जाने दो, जाने दो...

बाबू : (ओरडत) क्या जाने दो ? क्या जाने दो ?

दाबके : झाली पुन्हा तुमची भांडणं सुरू ? किती वेळा सांगायचं ? अरे आपण आलोय कोणत्या कामाला, आणि करतोय काय हे ?

बिहारी : मैने क्या झूट कहा ? चंद्रा सीओके पास जाती नही क्या ? (बाबू पुन्हा आक्रमक होतो.)

बाबू : जाती है, मगर काम के लिए…

बिहारी : वही मै बोला, मगर कौनसा `काम` ? (बाबू चिडून पुन्हा त्याच्या अंगावर धावतो

ü

दोघेही उलटे-पालटे- होत आहेत.)

दाबके : (दोघांनाही) नालायक साले... (बाबूला) चल उठ... झोपायला चल... (त्याला आधार देऊन उठवतो. बाबू एकदम भावविवश होत दाबकेला... आणि काही स्वत:शी)

बाबू : मी नामर्द न्हाय दाबके... नामर्द न्हाय... पन त्या भडव्या सी.ओ.ची भीती वाटते... सारखा साला डोळ्यासमोर येतो. (दाबके त्याला घेऊन बाजूच्या पडवीच्या दिशेने चालू लागतो) जवळ घेतली तरी त्याचाच चेहेरा दिसतो समोर... आन मग मी काहीच करू शकत नाय... काहीच नाय... मेल्यागत पडून ऱ्हातो... (बरळत) पन मी नामर्द नाय... नामर्द नाय. (दाबके त्याला हलक्या हाताने थोपटू लागतो.)

18. **रात्र**.

सी.ओं.चा बंगला. चंद्राच्या गुणगुणण्याचा आवाज. ती स्वयंपाकघरात. शेवटचे भांडे धुवून ओट्यावर ठेवते आणि फरशी पुसू लागते. मधल्या खोलीत सी.ओ. (लुंगी बनीयनवर) आरामखुर्चीत बसलेत. तिच्या हालचालींवर तेथून नजर ठेवून तिला न्याहाळीत आहेत. ती फरशी पुसून, पोतेरे पिळून, वाळत घालून पदराला हात पुसत बाहेर येते.)

चंद्रा : मी जाते सायेब...

सीओ : हो... जा... जा... आणि हे बघ...

चंद्रा : काय ?

सीओ : (तिच्या डोळ्यात रोखून पाहत) सकाळी जरा लवकर ये आणि येताना माझे कपडे घेऊन ये.

चंद्रा : व्हय सायेब... दुपारीच टाकलेत इस्त्रीला... (ती निघते.)

सीओ : (तिला नजरेनी अडवत) बाबू आला नाही अजून ?

चंद्रा : नाय सायेब.

सीओ : (रोखून पाहत) रात्री आठवण येत असेल... (लोचट हसतात. चंद्रा त्यांच्याकडे पाहत काही क्षण तशीच घुटमळते. त्या निसरड्या क्षणावर ताबा मिळवण्यासाठी कसोशीने स्वत:ला खंबीर करत नेते आणि निर्धाराने बाहेर पडते. सी.ओ. खजील झालेले.)

(गंगावतीची झोपडी. झोपडीच्या आतील भिंतीचा एक कोपरा ठिपक्या ठिपक्याच्या रंगीबेरंगी प्रकाशाने एकदम उजळून निघतो. ते ठिपके हलत आहेत. फिरत आहेत. हळूहळू कॅमेरा बिहारीच्या हातावर येतो. त्याच्या हातात गंगावतीची भिंगांची चोळी असते. तो ती कंदीलासमोर विशिष्ट कोनात धरून गंमतीनं फिरवत असतो. त्यामुळे भिंतीवर प्रकाशाचे विविध भ्रम दृग्गोचर होतात. गंगावती बिहारीच्या बाहुपाशात. बिहारी पराकोटीचा सुखावलेला. स्वप्नाळू नजरेनं तो ती प्रकाशाची किमया पाहत राहातो. दोघेही एकमेकांकडे न पाहता बोलत आहेत.)

गंगा : मै क्या बोलती...

बिहारी : क्या ?

ü

गंगावती : कब करता सादी ?

बिहारी : करूंगा !

गंगावती : कब करूंगा... हर बार यही बोलता है...

बिहारी : समय आनेसे पहले कुछ नही होता...

गंगावती : खूद को बडा ग्यानी समझता है तू - (बिहारीला ते विशेषण नेहमी आवडतं. तो सुखावून स्मीत करतो)

गंगावती : - मगर तेरे जैसा पागल दुसरा कोई नाही...

बिहारी : (लक्षपूर्वक) क्यूं... क्यूं ?

गंगावती : (संकोचत) तू समझता कैसे नाही...

बिहारी : क्या ?

गंगावती : अरे नालायक तू बाप बननेवाला है अभी...

बिहारी : (उठत तिच्या डोळ्यात पाहत) क्या ? फिरसे बोल, फिरसे बोल...

गंगावती : भगवान की कसम. झूट नही बोलती मै ! (बिहारी चक्रावून तिच्याकडे पाहतच राहतो. विचारात पडतो. गंभीर होतो.)

गंगा : (डोळ्यात पाणी) मै अब सादी करना चाहती हूं. अपना घर बसाना चाहती हूं. हम सांतीसे जिएंगे फिर... बोल...

बिहारी : मै भी अब घर बसाना चाहता हूं गंगा... रोज रोज ये बाहर का खाना, टेन्सन... ये बिडी चिलम... मै भी अपनी एक नयी जिन्दगी शुरू करना चाहता हूं...

गंगावती : पर कब ? मेरे मरने के बाद ?

बिहारी : ऐसा मत बोल. खुदा के वास्ते... (एकदम वास्तवात येत) ये उंट को ले जाने दो. प्रोग्राम होने दो... फिर साबसे बात करता हूं... पर्मनंट करने का बोल रहे थे... अभी फायनल पूछ लेता हूं...फिर हम दोनो राजा-रानी...

गंगावती : (डोळे डबडबलेले) सच ?

बिहारी : हं बिलकूल सच. (बिहारीच्या कुशीत शिरते. तो तिच्या डोळ्यातील अश्रू पुसतो.)

19. **सकाळ.**

गंगावतीचे घर. कुत्र्यांच्या भुंकण्याचा आवाज. ट्रकसमोर चटईवर उशाला हात घेऊन पडलेला दाबके त्या आवाजाने चट्कन उठतो. प्रथम तो उंट बांधलेल्या झाडाकडे पाहतो पण तिथे उंट नाही. शॉक बसल्यागत उठून उभा राहतो. पुन्हा पाहतो. उंट तिथं नाही याची खात्री होते. धावत ट्रकजवळ येतो. केबीनचा दरवाजा उघडून बाबूला हलवतो...

दाबके : बाबू... उठ... उठ लवकर... बाबू...एऽऽऽ बाबू, अरे उठ...

बाबू : (त्याच्या आवाजातील भय जाणवून बाबू चट्कन उठून बसतो. डोळे चोळत.) काय रे, काय झालं ?

दाबके : उंट दिसत न्हाय जाग्यावर !

बाबू : काय उंट दिसत नाय ? (बाबू खाली उडी मारतो. पाहतो. त्यालाही उंट दिसत नाही.

ü

तिथंच डोक्याला हात लावून तो खाली बसतो.)

बाबू : बिहारी कुठाय ?

दाबके : झोपलाय अजून. चल ! (दोघेही झोपडीकडे धावतात.)

(आत येतात. दाबके बिहारीला गदागदा हलवतो. बिहारीऽऽऽ बिहारी ऽऽऽ

बिहारी : (हातपाय ताणून आळस देत) क्या कटकट है रे सुबे सुबे ?

दाबके : अरे उठ लवकर, उंट दिसत नाही कुठं.

बिहारी : (चट्‌कन उठून बसत) क्या ? क्या बोला ?

दाबके : हां... उंट दिसत नाही... (बिहारीची झोप खाड्‌कन उडते. तो शेजारी पडलेली बंडी उचलून खांद्यावर घेत तसाच बाहेर येतो. पाठोपाठ हे दोघे. बाहेर येऊन पाहतात. झाडाजवळ उंट नाही. इकडे तिकडे पाहतात. पण तो कुठेही दिसत नाही.

दाबके : (कपाळावर हात मारून घेत) नशीब फुटलं आपलं, बरबाद झालो आपण आता...

बिहारी : और ये गंगावती किधर गयी ? गंगाऽऽऽ (बिहारी खाटेवर बसलेल्या त्या वृद्ध बाईला `गंगावती किधर है` असे विचारतो. ती आपल्या तोंडाचे बोळके हलवत - खालच्या दिशेने बोट दाखवत `पानी लाने कू` असे तोंडातल्या तोंडात उत्तर देते. बिहारी त्या दोघांना घेऊन खालच्या दिशेने निघतो.
रस्त्याच्या खालच्या बाजूने वर येणारी गंगावती दिसते. तिच्या डोक्यावर एकावर अशा दोन घागरी. खांद्यावर धुतलेल्या कपड्यांचे पिळे, ती न्हाऊन केस मोकळे सोडून प्रफुल्लित चित्ताने वरती येत आहे. तिघेही धावत तिच्या दिशेने निघतात.)

गंगावती : क्यूं रे, क्या हुवा ?

बिहारी : करम फुट गये.

गंगावती : क्या बोला ?

बिहारी : (ओरडत) सुनती नही... करम फूट गये...

गंगावती : मगर हुवा क्या ?

बिहारी : उंट भाग गया ! (गंगावती तशाही स्थितीत हसू लागते...)

बिहारी : हमारी जान जा रही है ओर तू हस रही है ?

गंगावती : हसू नही तो क्या करू ?

बिहारी : क्यूं ?

गंगावती : मैने ही उंट को छोड दिया !

बिहारी : छोड दिया ? पागल होगयी क्या ? किधर है वो ?

गंगावती : अरे अपने माफक उसेभी कुछ-खाना पिना चाहिए क्या नाही ? आव यहां... देखो उधर... (सर्वजण एकत्र येतात ती त्याना खालील दरीत एका ओहोळाच्या काठी शांतपणे चरणारा उंट दाखवते.)

दाबके : चल्... चला लवकर... पळाला तर सत्यानाश होईल आपला... (तिघेही पडत ठेचकळत, धडपडत... झपाटल्याप्रमाणे खाली पळू लागतात. गंगावती मान हलवत

ü

निरागसपणे हसत राहते. संगीत)

20. **संध्याकाळ**.

रस्ता. वाळवंटी प्रदेशाच्या खुणा आता संपत आलेल्या आहेत. गुजरात, मध्यप्रदेश आणि महाराष्ट्राच्या सरहद्दीवरचा प्रांत. थोडा गूढ आणि भयावह वाटणारा. संगीत. बाबू पेंगतोय. दाबके एक मोठी जांभई देतो. बिहारी त्याच्याकडे 'जांभया काय देतोहेस साल्या' ह्या अर्थाचा एक कटाक्ष टाकतो.)

दाबके : रस्ता बरोबर आहे ना रे ?

बिहारी : हां यार. मै तो इस रास्ते से कई बार आता जाता हूं... (बाबूचा चेहेरा दिसतो. पेंगेतच तो काहीतरी हुंगतोय. सावध होऊन पुन्हा जाणीवपूर्वक काहीतरी हुंगतोय.)

दाबके : कसला तरी वास येतोय रे बिहारी... (बिहारी त्याच्याकडून क्ल्यू घेऊन चट्कन टेंपरेचर मीटर पहातो. मीटरचा क्लोजअप. काटा शंभरवर गेलाय)

बिहारी : हां यार. अच्छा हुआ, तूने जो याद दिलादी...(म्हणत गाडी चालू अवस्थेतच उभी करतो आणि खाली उतरून बॉनेट खोलतो)

दाबके : च्यायला आता काय झालं ? (म्हणत खाली उतरतो. पुढच्या बाजूला येतो.)

बिहारी : (हाक मारत) बाबू ऽऽऽ अरे वो पानीका डिब्बा लेके आव... (बाबू पायाजवळ ठेवलेला पाण्याचा डबा घेऊन खाली उतरतो आणि बिहारीच्या हातात देतो. बिहारी गुणगुणत वॉटरबॉडीत पाणी ओतू लागतो. दाबके बाजूला जातो आणि पाठमोरा उभा राहून लघवी करू लागतो. ते पाहून बाबूला त्याची गंमत करण्याची हुक्की येते. तो हळूच त्याच्या मागे जाऊन जोराने `भॉ ऽऽऽ` असे करतो. त्या बरोबर दाबके घाबरतो. बॉनेटच्या आडून बिहारी पाहतो. बिहारी, बाबू दोघेही हसू लागतात. वस्तुस्थिती लक्षात आल्यावर दाबके चिडतो. पॅन्टची बटने तशीच उघडी ठेवून तो एक दगड उचलतो आणि बाबूच्या अंगावर धावतो. ``भोसडीचे साले, शांतपणे लघवीपण करून देत नाहीत...`` असं म्हणत राग व्यक्त करतो. बिहारी हसत हसत ``जाने दो... जाने दो...`` म्हणत त्याची समजूत काढतो आणि पाण्याचा डबा घेऊन बॉनेट तसेच उघडे ठेवून गाडीत येतो. आणि ॲक्सिलेटर फूल करून पुन्हा प्रेशर पाहतो तर काटा पुन्हा 100 वर. त्यामुळे काळजीत पडल्यासारखा चेहेरा करून तो पुन्हा खाली उतरतो आणि हाक मारतो.) बा ऽऽऽ बू...

बाबू : (येत) काय ?

बिहारी : (ॲक्सिलेटर दाखवून समजावून सांगत) देख, इधर पाव रखके दबाने का, मै जब बोलूंगा तब - समझा ?

बाबू : (बाबू उत्साहाने) बरं बरं... (तो एकदम वर चढून व्हीलवर बसतो. बिहारी पुन्हा बॉनेटवर चढतो आणि जोराने बाबूला)

बिहारी : हां, दबाव !

बाबू : बाबू ॲक्सिलेटर दाबतो... (आवाज येतो...)

बिहारी : और दबाव... (बाबू दाबतो... आणखी आवाज येतो.)

बिहारी : और दबाव (बाबू आणखी दाबतो. रेसिंगचा कर्कश आवाज येत राहतो.

बिहारी : बस बस रूको अभी... (म्हणत, खाली उडी मारतो आणि पुन्हा केबीनकडे येतो...)

ü

दाबके : काय झालं ?

बिहारी : नसीब अच्छा है अपना. फॅन बेल्ट साथ मे था (मागच्या सीटखाली हात घालून दोन तीन पाने आणि फॅनबेल्ट बाहेर काढतो) अच्छा हुवा इधर ही ध्यान मे आया नही तो लफडा हो सकता था...

दाबके : म्हणजे ?

बिहारी : अगर वायरिंग जल जाती तो कुछ नही कर सकते थे हम. (तो पुन्हा बॉनेटमध्ये घुसून
पान्याने पुली सैल करतो आणि फॅनबेल्ट बसवू लागतो. इंजिनच्या खालून त्याचे हात आणि चेहेरा दिसत आहे.)

बाबू : (खालूनच) किती येळ लागल रे बिहारी ?

बिहारी : होगा अभी...

दाबके : (घड्याळातली तारीख बघत) वेळेवर पोहोचलो नाही तर साहेब सोडणार नाहीत आपल्याला... जल्दी कर !

बिहारी : (नट फिट करता करता) ऐसे करते है..

दाबके : क्या ?

विहारी : यहांसे शॉटकट है. उधरसे डालते है गाडी...

दाबके : शॉर्टकट ?

बिहारी : हां (फाटा दाखवत)... ये जो आगे कच्ची सडक दिख रही है ना वो आगे जा के हायवे को मिलती है. सौ-देढ सौ मिल का फेरा बच सकता है अपना. (हात झटकत) चलो...

बाबू : (भयग्रस्त) माझं ऐका, थोडा उशीर झाला तरी चालंल पन भलती जोखीम नको...

बिहारी : क्यूं ?

बाबू : एकतर हा परमुलुख, त्यात रात व्हया आली...

बिहारी : तू हमेशा साला गांडूगिरी करता है.

बाबू : गांडूगिरी का सवाल नही... सोबत उंट हाय... कुठं काय भानगड झाली तर ?

बिहारी : (त्याला महत्व न देता) हां चल् चल् अभी, बैठ - पनवती मत लगा... (सर्वजण बसतात. ट्रक स्टार्ट होतो... थोडा पुढे येऊन हायवे सोडून फाट्यावर वळतो आणि हळूहळू पुढे सरकू लागतो.)

21. (**संध्याकाळ**.
रस्ता.
संधीप्रकाश. कॅमेरा ड्रायव्हरच्या अॅन्गलने पाहतोय. एका खोलगट भागाकडून उंच भागाकडे गाडी चालली आहे. खिंडीसारखा भाग. उंचवट्यावर आभाळ टेकले आहे असे खालून वाटते.
ट्रक हळूहळू पुढे सरकत आहे. एकाएकी त्या आकाशाच्या तुकड्यात खालून एक

ü

मशाल वर आलेली दिसते. गाडी जसजशी पुढे जाते तसतशी मशालींची संख्या वाढलेली दिसते. मग मशाली धरलेली माणसे दिसतात. 30-4 0 माणसांचा तांडा. काही धार्मिक करणानं सारे एकत्र आले आहेत. एका हातगाडीवर देव-देवतांचे काही टाक. फुले, गुलाल. नारळ.उदबत्या लावलेल्या. सर्वजण दारू पिऊन गांजा ओढून तर्रऽऽऽ झालेले. कुणी ताशा, कुणी पिपाणी वाजवतोय, सर्वांनी विचित्र ताल धरलेला. त्यात त्यांच्या आरोळ्या, आनंदोत्तेजक चित्कार... ट्रक आणि तो घोळका तुकड्या तुकड्याने परस्परांच्या जवळ येऊ लागतात.

दाबके : लग्नाची वरात दिसतेय...

बाबू : पन नवरा-नवरी तर दिसत न्हायीत. देवाची पालखी दिसतीय...

बिहारी : (पॉम्... पॉम्... असा जोराने फुगा वाजवतो) साले बाजूभी नही हटते. (तशीच पुढे गाडी रेटतो. पण मॉबने आता पूर्णपणे रस्ता अडवलेला. ट्रक बघून त्याना अधिकच चेव येतो व ते बेभानपणे नाचू लागतात.)

दाबके : (चिंताग्रस्त) काहीतरी वेगळाच तिढा दिसतोय.

बिहारी : (दारातून मान बाहेर काढत एकाला) अरे यार, जरा बाजू हटो, दिखता नही क्या ? (त्याचे बोलणे गोंगाटात कुणालाच ऐकू येत नाही. उलट सर्वजण आता ट्रकसमोर नाचताहेत. त्यांच्यात तरूण, बापू आणि हिजडा या तिघांची व्यक्तिमत्वं ठळकपणे नजरेत भरतात. बापू त्या सर्वांचा म्होरक्या. पिळदार मिशा, भला मोठा फेटा. टपोरे तांबारलेले डोळे. तरूण एकदम टपोरी. हिजडा भडक मेकपमध्ये, साडी नेसलेला, बेभान. नाचता नाचता तरूण फटाक्याची एक मोठी माळ काढतो आणि ती वर धरून हलवू लागतो. सारे चित्कारतात. फटाक्याची माळ पेटवली जातेय हे सर्वात आधी बाबूच्या लक्षात येते. तो जीवाच्या आकांताने 'आरं फटाका पेटवतायंत' असं ओरडत झट्कन ट्रकातून खाली उडी मारतो आणि तरुणाच्या हातातील माळ, आणि आगपेटी ओढून घेत.)

बाबू : नका, नका, फटाका नका वाजवू ! फटाका नका वाजवू साहेब. (गोंधळ चालूच असतो त्यामुळे त्याचे म्हणणे स्पष्टपणे ऐकू येत नाही. बापू शांतता प्रस्थापित करण्यासाठी हात वरती करतो. बाबूचे कृत्य त्याला अपमानास्पद वाटते. जीवघेणी शांतता. बापू थंड, हिंस्त्र.)

बापू : (बाबूला) काय म्हनतो ?

बाबू : (हात जोडून) फटाका वाजवू नका मालक... मेहेरबानी करा...(बापू खसकन गुप्ती बाहेर काढतो आणि त्याच्या मानेवर टेकवतो)

बापू : लई माजलास रे भडव्या. फटाका का वाजवायचा नाय आमी ? का वाजवायचा नाय फटाका ?

बाबू : (हात जोडून) ट्रकात उंट हाय मालक...

बापू : उंट ?

बाबू : जी मालक ! उंट फटाक्याला घाबरतो. त्याचा जीव जाईल, आमची नोकरी जाईल...

बापू : (चेकाळत) ट्रकात उंट हाय रेऽऽऽ उंट ! ('उंटऽऽऽ उंट' असा जल्लोष करत सर्वजण पाठीमागे धावतात. ट्रकला लोंबकळू लागतात. वर चढण्याचा प्रयत्न करू

ü

लागतात. वाजंत्र्यानाही चेव येतो. 'वाईड अँगल फिश आय लेन्सने' खांद्यावर कॅमेरा ठेवून चित्रित केलेला हलता शॉट. बहर्गोल आरशात जसे माणसांचे चेहेरे विकृत दिसतात त्या पध्दतीने बापू, तरुण, हिजडा, यांचे मस्तवाल, विकृत चेहेरे एकामागून एक दिसत रहातात. ताशा-वाजंत्री यांचा गोंगाट सुरूच.

बिहारी आणि दाबके खाली उतरतात. लोकांना ट्रकमध्ये चढण्यापासून परावृत्त करू पाहतात. एक टारगट पोरगा ट्रकवर चढून काठीने उंटाला डिवचण्याचा प्रयत्न करतो. ते पाहून बिहारी त्याची कॉलर पकडून तिरमिरीने त्याला खाली खेचतो. बापूच्या ते लक्षात येतं तो पुढ येऊन खाड्कन बिहारीच्या कानशिलात मारतो. बिहारी क्षणभर क्रूद्ध, संतप्त पण पुढच्याच क्षणी त्याचा चेहेरा विचारी-शहाणा होतो. फटाक्याची लड नाचवत तरूण बापूजवळ येतो.)

तरुण : बापूऽऽऽ... फटाका वाजवायचाय...

बापू : मग वाजीव की (स्वत:च्या खिशातली काडेपेटी काढून फर्रकन काडी पेटवतो.)

बाबू : (गयावया करीत) नका सेठ, नका मालक, फटाका वाजवू नका. उंट घाबरून उडी मारंल, त्याचा पाय मोडंल, जीव जाईल. आमची नोकरी जाईल... पोटावर पाय आनू नका मालक... सोडा आमाला...

बिहारी : (निकराचा प्रयत्न करत) देखो भाईयो, ये सरकारी काम है... सरकार की हकूम से ये उंट हम ले जा रहे है...अगर इसमे कुछ गडबड हो गयी तो सब को भुगतना पडेगा... जेल काटनी पडेगी...

बापू : (बापू हात वर करतो, शांतता.) काय मंडळी... सोडायचं ह्याना ?

तरुण : ह्याना सोडा, उंट ठिवून घ्या ! आपल्याला पायजे. (सर्व हसतात)

बापू : (चेष्टेत) जेलमधी जाण्याची तयारी हाय का ?

एकजण : हाय मालक... (सगळे हेऽऽऽ करून त्याला सपोर्ट करतात)

हिजडा : (अश्लील अंगविक्षेप करीत) 'उंट ठिवून घ्या इल कामालाऽऽऽ' (म्हणून नाचू लागतो. सर्वजण हेऽऽऽ करून त्याला साथ देतात.)

बापू : (हात वर करतो. शांतता. दाबकेला) तुमाला सोडतो, उंट ठिवा.

बाबू : हात जोडतो मालक, सरकारी काम हाय. तुमाला तरास व्हईल. उंटाला ठिवू नका.

बापू : मग तू रहातो का त्याच्या बदली ?

बाबू : (विचारात पडतो)

बापू : उंट सोडतो. त्या बदल्यात तू ऱ्हायाचं... कबूल ?

बाबू : (निर्णायकपणे) जी हां, ऱ्हातो...

बिहारी : नही यार... नहीऽऽऽ

बाबू : (त्याला रोखत) तुम्हे मेरी कसम... ज्यादा टाईम घालवू नका ... जा तुमी.. . मी कसातरी ह्याना चकमा देऊन सकाळपतूर हाय वे ला पोचतो... तिथं वाट बघा माझी...

दाबके : पण बाबू...

ü

बाबू : (त्याला हुकूमी स्वरात) जायाचं म्हंजे जायाचं...मला कायबी व्हनार न्हाय... मी गाठतो तुमाला बरोबर... जावा तुमी...(बिहारी हतबलपणे वर चढून ट्रक सुरू करतो. बाबू दाबकेला ढकलतच ट्रकजवळ नेतो. मॉबचे चित्कार, वाद्ये सुरू. कोणत्याही क्षणी त्यांचा बेत बदलू शकेल ह्या धास्तीने बाबू दाबकेला ट्रकवर जवळजवळ ढकलतोच. दाबके दाराला लोंबकळतो... ट्रक तसाच चालू... कांही क्षण लोंबकळतच दाबके ट्रकबरोबर जातो नंतर आत शिरतो. ट्रक पुढे गेल्यावर त्याचा लालभडक टेल लाईट बाबूवर आणि मॉबवर पडतो...

एकजण : बापू, उंट का सोडला ?

बापू : (बाबूकडे निर्देश करीत) ह्यो काय आपला उंट !

सगळे : उंटऽऽऽ उंटऽऽऽ

दुसरा : तुझं नाव काय ?

बाबू : बाबू.

बापू : आन उंटाचं काय ?

बाबू : जहांगीर !

बापू : मग तुझंबी नाव जहांगीर... (दमात घेत) काय नाव तुझं-बोल ?

बाबू : जहांगीर. (सर्वजण हसतात.)

बापू : (हिंस्त्र) मंग आता उंटागत चालून दाखीव ! (बाबू उंटासारखे पाठीत पोक काढून फताड्या पायानी चालू लागतो. सर्वांच्या विकृत टाळ्या, हशा... एकजण त्याच्या डोक्यावर दारूची बाटली ओततो. दुसरा त्याच्या डोक्यावर आणि तोंडावर गुलाल फासतो... तो आता भेसूर दिसत आहे. संगीत.)

बापू : आता उंटागत शेपूट हलवून दाखीव. (बापू मागे हाताची शेपटी करुन हलवून दाखवतो. सगळे जल्लोष करतात.)

बापू : आता उंटागत पादूनबी दाखीव ! (बाबू एक पाय वर करून तोंडाने पादण्याचा आवाज काढतो. सर्वजण अधिकच चेकाळतात. एकजण बाबूच्या पाठीवर बसतो. हिजडा त्याच्या समोर लचकत गातो 'उंट ठिवून घ्या इल कामालाऽऽऽ')

तरुण : बापूऽऽऽ (बापू पाहातो, फटाक्यांची लड दाखवीत) फटाका वाजवायचा...

बापू : मंग वाजीव की !

तरुण : उंटाच्या शेपटीला बांधायचा व्हता...

बापू : (बाबूकडे निर्देश करीत) मग बांध की ह्याच्या... (इतरांच्या मदतीने तरूण बाबूच्या कमरेभोवती दोरा बांधून त्याला शेपटीसारखी फटाक्याची माळ बांधतो.

सर्वजण पुढच्या क्रूर प्रसंगासाठी आसुसलेले. ताशा टिपेला गेलेला. तरूण फटाक्याची माळ पेटवतो. `ताड् ताड् फटाक् फटाक्` आवाज करत फटाके फुटू लागतात. ताशा, पिपाणी वाजतच आहे. हिजडा बेभान होऊन नाचू लागतो. बापू हातातली गुप्ती झेंड्यासारखी मिरवत नाचू लागतो...

आता सर्वजण भेसूर-भयानक गात आहेत-`उंट ठिवून घ्या ईल कामाला`ऽऽऽ बाबू चटके बसत असल्यामुळे या पायावरून त्या पायावर धडपडू लागतो. त्यातच

ü

त्याला एक कल्पना सूचते व तो हळू हळू अंदाज घेत मॉबच्या बाहेर येतो आणि रस्त्याच्या खाली उतरून डोंगर उतारावरून पळू लागतो. आधी अंदाज घेत, नंतर जीवाच्या आकांतानं... शॉर्टकटनं हाय वे ला पोहोचण्याच्या इराद्यानं...मॉबमधून आवाज येतात.)

1 : अरे भाग गयाऽऽऽ पळालाऽऽऽ पळालाऽऽऽ

2 : मारा साल्यालाऽऽऽ

3 : धराऽऽऽ धराऽऽऽ पकडो-पकडो !

(दोन तीनजण थोडा पाठलाग करतात. दोघे तिघे दगड उचलून मारतात. एकजण बाटली फेकून मारतो. ते सर्व सहन करत बाबू खड्डयातून, काट्याकुट्यातून दगडधोंड्यातून पळत राहतो. ठिणग्या उडताना दिसतात. अंधारात संपूर्ण पडदा फटाक्यांच्या ठिणग्यांनी पेटून गेला आहे असे वाटते. संगीत.)

22. **पहाट**.

रस्ता.

हाय वे वर ट्रक उभा. टायरला टेकून बिहारी बसलेला. त्याच्या शेजारी दाबके. दोघेही तारवटलेल्या डोळ्यानी आणि पश्चात्तापाच्या भावांनी बाबूची प्रतीक्षा करताहेत. ट्रकच्या मागून सूर्य उगवत आहे. कोवळे प्रसन्न किरण पसरतात. संगीत. बिहारीच्या नजरेने कॅमेरा बघतो. दूरवरून बाबू खुरडत खुरडत येत असल्याचे दिसते. बिहारी व दाबके उठून उभे राहतात. बाबू अधिक जवळून दिसतो. अंगभर वाळलेली दारू त्यावर चिकटलेली माती. हाताचे कोपर, खरचटलेले. पॅन्ट फाटलेली. पोटऱ्या पोळलेल्या. तोंडावर वाळलेल्या गुलालामुळे चेहरा भेसूर. बिहारी धावत जाऊन त्याला मिठीत घेतो... दाबके त्याच्या जखमांवरून हात फिरवू लागतो.

बिहारी : क्यूं इतनी कुर्बानी दियी तूने ? क्यूं ?

बाबू : पोटासाठी... नौकरीसाठी... तुमाला माहीत हाय सायेब किती कडक हाय ते. उंट सुखरूप गेला न्हाय तर नोकरी जाईल आपली...

बिहारी : मी तुला चिडवतो, नामर्द म्हणतो...पण खरा मर्द आहेस तू. हम लोग भाग चले आये-पन तू...

बाबू : असं नाय. तुमची पण जबाबदारी मोठी हाय... तुमी जर पळाला नसता तर उंटाला जित्ता सोडला नसता त्यांनी... आता काय चिंता नाय. सुटलो आपण...

(बेहोश होऊन बिहारीच्या अंगावर पडतो. बिहारी व दाबके त्याचे दोन्ही हात आपल्या खांद्यावर घेऊन ट्रकच्या दिशेने चालू लागतात. कॅमेरा पाठीमागून चित्रण करीत पुलबॅक करतो जणू काही त्या तिघाना पुढे जायचे आहे परंतु नियती त्याना मागेच खेचत आहे.)

रात्रीचे 9.00 वाजलेत. सी.ओं.चे घर. ते लुंगी बनियनवर. अस्वस्थपणे फोन फिरवत आहेत. चंद्रा किचनमध्ये स्वयंपाक करत आहे. फोन लागतो.

सी.ओ. : हॅलो, हॅलो व्यासजी... नमस्ते... मै धुलिया से सी.ओ. साने बोल रहा हूं.

व्यास : (ते आता त्यांच्या उदयपूरच्या निवासस्थानी) हां... हां... क्या हाल है सानेजी, उंट

ü

पंहुचा के नही ?

सी.ओ. : इसीलिए तो परेशान हूं... अभी तक आये नाही वो लोग.

व्यास : (हिशेब करत) देखो, मंडे... ट्युसडे... थर्सडे... फ्रायडे... आज रात को या कल तक पंहुच जाना चाहिए उनको...

सी.ओ. : ठीक है... सुबह तक इन्तजार करता हूं... नही तो भेज देता हूं दोन तीन आदमीयोंको उनकी तलाश मे...

व्यास : ठीक है, ठीक है... अगर मेरी मदद की कुछ जरूरत पडेगी तो जरून बोल देना...

सी.ओ. : जी थँक्यू. (फोन ठेवतात. उद्रेकाने) हरामखोर, भोसडीचे साले !
(चंद्राचा तणावग्रस्त, भयभीत चेहेरा.)

23. **दुपार**.

रस्ता. चालू ट्रक. खिडकीजवळ मान टेकून बसलेला बाबू दिसतो. अंतर्बाह्य घायाळ. केवीलवाणा. बिहारी समोर पाहतो. समोर एक छोटासा घाट. घाट पाहून बिहारी सुटकेचा निश्वास टाकतो.

**दाबके** : (बाबूला) एवढा घाट संपला की पोचलो आपण. गावी गेल्यावर औषधपाणी करून घेऊ. बरा होशील तू. सी.ओ.साहेबाना सगळं सांगू. खूष होतील ते तुझ्या कामगिरीवर. बक्षिसीपण मिळेल तुला. (बाबू खिन्नपणे हसतो. त्याचे डोळे एका नव्या आशेनं चमकत आहेत.)

**इंटरकट**

(सजवलेले व्यासपीठ. स्थानापन्न पाहुणे. समोर मोठा जनसमुदाय. माईकवर सी.ओ.साहेब. मोठ्या उत्साहानं भाषण करीत आहेत.)

**सीओ** : बंधूंनो आणि भगिनींनो, हा उंट जो आज इथं आलेला दिसतो त्याचं संपूर्ण श्रेय खरं म्हणजे ज्याना दिलं पाहिजे ती माणसं पडद्यामागची, तळागाळातली आहेत. आपला जीव धोक्यात घालून त्यांनी हा उंट इथवर आणला आहे, हे मला अभिमानानं सांगितलं पाहिजे. आज आपण त्यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करीत आहोत. मी प्रथम बाबूला व्यासपीठावर येण्याची विनंती करतो... (नीटनेटका, टापटीप, आनंदित, प्रोत्साहित बाबू स्टेजवर येतो. मुख्यमंत्री त्याच्या गळ्यात भलामोठा पुष्पहार, अंगावर शाल घालतात आणि हातात श्रीफळ देऊन फोटोसाठी पोज देतात. कॅमेऱ्यांच्या फ्लॅशचा चकचकाट. टाळ्यांचा कडकडाट.)

**सीओ** : (घोषित करतात) सत्काराचा दुसरा मानकरी आमचा ड्रायव्हर... रासबिहारी (पुन्हा सर्व तसेच)

**सीओ** : आणि पुढचे मानकरी आमचे क्लार्क श्रीयुत दाबके. (पुन्हा तेच) (तिघेही कृतकृत्य झाल्यासारखे व्यासपीठावर उभे.)

**सीओ** : उंट आणण्याची कामगिरी यशस्वी केल्याबद्दल मी, रासबिहारी ड्रायव्हर आणि बाबू यांची नगरपालिकेच्या स्टाफवर कायमस्वरूपी नेमणूक करीत आहे. (टाळ्या) श्रीयुत दाबके, रासबिहारी आणि बाबू या तिघांनाही दोन अतिरिक्त वेतनवाढी देण्याची घोषणाही मी करीत आहे. (प्रचंड टाळ्या)

(ट्रकचे चाक एका खड्डयात गेल्यामुळे तो कलंडतो आणि बाबूचे डोके खिडकीवर आपटते. तो खाड्कन जागा होतो कण्हतो. त्याचे स्वप्नं भंग पावते. इंटरकट

ü

संपतो.)

बिहारी : क्या हुआ ?

बाबू : (मान हलवून काही नाही असे सुचवतो. डोळे रिकामे.)

`नगरपालिका धुळे` अशी अक्षरे लिहिलेली एक जीप धुळ्याहून बिकानेरच्या दिशेने निघालेली आहे. ड्रायव्हर, मागे अधिक्षक आणि क्लार्क असे कर्मचारी. जीप पळत आहे. (संगीत)

- समोरचा रस्ता झपाट्याने पुढे येत आहे.
- दोन्ही बाजूनी झाडे मागे पळत आहेत.
- मागे रस्ता लांब लांब जात आहे.
- मधूनच अधिक्षक/क्लार्कचा तणावग्रस्त चेहेरा.

अधि. : सालं ह्यांना झेपत नाही तर पाठवायचं कशाला ?

क्लार्क : न झेपायला काय झालं ? पगार कसा घेतात ?

अधि. : खरं आहे तुमचं पण मधल्यामधी आपल्याला त्रास होतोय त्याचं काय ?

क्लार्क : हो, ते ही खरंच म्हणा...
(पुन्हा शांतता. पळणारी जीप...)

बिहारी : ये घाटी पार की कि आपन पहुंच गये समझो की हो गया... (बिडी माचीस काढून बाबूकडे देत) ले... पि ले... और मुझे भी दे दे... (बाबू विडी पेटवू लागतो. बिहारी नेटाने ट्रक चढवू लागतो.)

24. (रात्र.
नगराध्यक्ष आबासाहेब पाटलांची बैठकीची खोली. फोनच्या रिंगचा आवाज येतो. टेलीफोन दिसतो. त्यावरून पुलबॅक्. हातातलं वर्तमानपत्र ते बाजूला ठेवतात आणि फोन उचलतात)

आबा : हॅलोऽऽऽ आबासाहेब पाटील बोलतोय...

आमदार : (फोनवरून उत्तर देताना दिसतात.) नमस्कारऽऽऽ आमदार जयसिंगराव जाधव बोलतोय.

आबा : नमस्कार-नमस्कार साहेब. काय विशेष ?

आमदार : सी.एम. येणारेत म्हणे उद्यानाच्या नुतनीकरणासाठी.

आबा : जवळ जवळ फायनल झालंय तसं.

आमदार : बागेत उंट येतोय म्हणे...

आबा : हो हो... बऱ्याच दिवसापासून मागणी होती पोरांची, म्हटलं पुरी करून टाकू...

आमदार : फार धडाक्यात तयारी चाललेली दिसतेय.

आबा : सी.एम. येणार म्हणजे सगळं दणक्यातच झालं पाहिजे, नाही का ?

आमदार : मला काही तरी गडबड दिसतेय ह्यात.

आबा : गडबड दिसली नाही तर विरोधी पक्षाचे आमदार कसले तुम्ही ? (पुन्हा हसतात. काही क्षणांच्या शांततेनंतर) काय-कसली गडबड ?

ü

आमदार : अहो, उडत्या पाखराची पीसं मोजणारी माणसं आमी.

आबा : तरी पण...

आमदार : वनमंत्र्यांवर मुख्यमंत्री नाराज आहेत हे सगळ्या जगाला ठाऊक आहे. कार्यक्रमाच्या निमित्तानं तुम्ही शक्ती-प्रदर्शन करणार आणि तिकीट पदरात पाडून घेणार (हसतात)

आबा : (हसू राखून ठेवत) छे छे काहीतरीच तुमचाआपला तर्क...

आमदार : कशाला नव्या नवरीसारखे लाजताय आबासाहेब. मागच्या इलेक्षनमध्ये शेवटच्या क्षणी पत्ता कट झाला तुमचा... आता बोरावक्यांना पुन्हा तिकीट मिळत नाही हे लिहून ठेवा…

आबा : (मोकळेपणाने हसत) तुम्ही झोपडपट्टी उठवायला मदत केली नसती तर मात्र काही खरं नव्हतं या उद्यानाचं...

आमदार : जवळपास दीडशे कुटुंबांची व्यवस्था करावी लागली. जागा दिली, सोसायटी करून दिली, कर्ज मिळवून दिलं…'डोकं' असलं की सगळं बरोबर होतं. जाऊ द्या. काम झालं हे महत्वाचं आता भूतकाळाचा विचार करत बसू नका.तुमच्या नशीबाचा उंट फायद्याच्या घरात आहे हे लक्षात घ्या. लोहा गरम है, मारो हथोडा. (हसतो)

25. रस्ता.

(रेसिंगचा कर्णकर्कश आवाज. घाटातले उंचावरचे क्लायमॅक्सचे वळण. एकीकडे उंच डोंगर. दुसरीकडे काळजाचा ठोका चुकवणारी खोल दरी. आणि त्याच वळणावर मोक्याच्या क्षणी एकदम खर्रऽऽऽ खट असा आवाज येऊन ट्रक दरीच्या दिशेला कलंडतो आणि तेथील मोरीवर अडकून बंद पडतो. जन्म-मृत्यूच्या सीमारेषेवर हे तिघे आणि उंट यांची सत्वपरीक्षा सुरू होते.)

दाबके : (शॉक बसल्याप्रमाणे रिॲक्ट होत) काय साली साडेसती लागली नशीबाला ही ?

बिहारी : चलो चलो उतरो…सम्हल के…(म्हणत एका मागून एक तिघेही ड्रायव्हर साईडने सावधपणे खाली येतात. मोरीच्या पायाकडून वर आलेले पण दरीकडे झुकलेले एक मोठे झाड आहे. त्याचा आधार कलंडलेल्या ट्रकला मिळालेला आहे. बिहारी खालून वाकून बघतो. ॲक्सल तुटून पडलेला)

दाबके : काय झालं ?

बिहारी : ॲक्सल टूट गया.

दाबके : मग आता ?

बिहारी : अब कुछ नही कर सकते. दुसरी गाडी लाके टो कर के ले जाना पडेगा…

दाबके : अरे देवा ! किती वेळ लागेल त्याला ?

बिहारी : मालूम नही. दुसरी गाडी के सिवाय रास्ता नाही...

दाबके : (हातावरच्या घड्याळातली तारीख पहात) बाप रे, उद्‌घाटनाचा कार्यक्रम तर दोन दिवसावर आलाय... काय सालं नशिबाला आलं हे...

बिहारी : (दाबकेला) ऐसा कर. जो मिलेगी वो गाडी पकड के जा तू, और दुसरी गाडी लेके वापस आ...

ü

बाबू : पन तो लवकर पोचला नाय; मधीच काय भानगड झाली तर ?

बिहारी : फिर मरो इधर ही... (तिघेही हतबल, एकमेकांकडे पाहतात) (उंट वरती थयथयाट करतो. ट्रक हलू लागतो. उंटासहीत ट्रक दरीत कोसळेल या भीतीने तिघेही गर्भगळीत झालेले.)

बाबू : तिकडं कसं पोचायचं ते नंतर ठरवू. पयले उंटाला भायेर काढू या. नाय तर आणखी नवी आफत यायची. बिहारी सावधपणे तोल सावरत एका बाजूने वरती चढतो आणि फाळक्याची एका बाजूची कडी काढतो. आता त्याला दुसऱ्या बाजूची कडी काढायची आहे. तो सरपटत तिकडे निघतो. उंट ओरडतो. ट्रक डळमळू लागतो. खालच्या बाजूला थोडा जरी तोल गेला तरी उंट आणि बिहारी यांचे जीवन धोक्यात येणार असते. बाबू आणि दाबके यांनी मागे साखळी तयार केली आहे आणि त्याचे पाय मागे ओढून धरले आहेत. बिहारी त्या बाजूला पोहोचून तिकडची कडी काढतो. फाळका दाणकन खाली पडतो. उंट बिथरलेला. त्याचा थयथयाट. त्याच्या नाकपुड्या फेंदारतात. उंट दरीच्या बाजूला गेला की ट्रक तिकडे कलंडायला लागतो. (संगीत)

फाळका पडतो. पण उंटाला मागे आणून उडी मारायला लावून रस्त्यावर आणणं अवघड आहे हे आता त्यांच्या लक्षात येतं.

बिहारी पुन्हा अशीच रिस्क घेऊन ड्रायव्हर केबिनमध्ये जातो. मागच्या सीटच्या खाली, असणारी टॉमी काढतो, ती घेऊन खाली येतो. मग तिघेही ट्रकच्या रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या भिंतीच्या फळ्या मोडून उंटासाठी वाट मोकळी करू लागतात. ती बाजू मोकळी होऊन पुरेशी जागा झाल्यावर ते उंटाला खाली उतरवतात. सामानही काढतात. वेसण धरून बिहारी पुढे येतो. मध्ये बाबू व शेवटी दाबके. ट्रकातून उडी टाकताना गंजलेल्या पत्र्याच्या टोकात अडकून दाबकेची पँट फाटते. तिथून थोडं रक्तही बाहेर येतं. आता दाबके चिडतो. त्याची सहन शिलता संपलेली. `तुज्या मायला तुज्या` म्हणत धावत पुढे येतो आणि उंटाला एक लाथ मारतो. उंट ओरडतो.)

दाबके : साल्या तुझ्यामुळं नशिबी हा भोग आला आमच्या. दीड दमडीचा उंटाड्या साल्या तू... आमच्या जीवावर उठलास ? काय वाईट केलं होतं आम्ही तुझं ?
(एक दगड उचलतो आणि मारण्यासाठी उगारतो. पण त्याला बिहारी अडवतो)

बिहारी : पागल हुवा क्या ? क्या कर रहा है तू ?

दाबके : हां. पागल हो गया हूं मै...पागल...ठार वेडा... आधी फक्त बुळ्या होतो आता वेडासुद्धा झालोय... कुठंही सरळ पाय टाकायला गेलो तरी तो वाकडाच पडतोय मायला ! कुणीतरी आधीच ठरवून ठेवलंय आपलं जगणं. हा कुबडा, कुरूप, उंटाड्या ठरवतोय आपलं नशीब... (परत उंटाच्या अंगावर धावून जातो.) काय रे भोसडीच्या ! का नाचवतोयस आम्हाला ? काय देणं लागतो आम्ही तुझं ?

बिहारी : सांती से काम ले - सांती से. (त्याच्या हातातील दगड काढून घेऊन त्याला थोपटू लागतो.) जो होता है. अपने भले के लिएही होता है. भगवान हमारी परीक्षा ले रहा है तो हम भी उसमे कामयाब होने की कोशीस क्यो न करे ? चल...

दाबके : काय करायचं आता ?

ü

बिहारी : सबकुछ ठीक हो जायेगा. चलो, पैदल निकलते है अभी, ये पहाडी उतरके सुबह तक गाव पहुचेंगे हम. (असं म्हणून एका चिडीनेच उंटाच्या वेसणीला खाली हिसडा देतो. त्याबरोबर तडमडत उंट खाली बसतो. बिहारी उंटावर लाकडी खोगीर घालतो आणि बाबूला उंटावर बसवतो. वेसण आपल्या पाठीमागून खांद्यावर टाकून चालणे सुरू करतो. उंटाही उठून निमूटपणे चालू लागतो. मागे दाबके. त्याच्या खांद्यावर उंटाच्या कपड्यांचे पोते. चालता चालता बिहारी तुलसीदासाचा दोहा म्हणू लागतो...

26.

दोहा : रस्ता.

लाज न लागत आपको दौडे आयहु साथ
धिक् धिक् ऐसे प्रेमको कहा कहहु मै नाथ
अस्थिचर्ममय देह ममता मे जैसी प्रिती
तैसी जो श्रीराम मॉ होती न तो भवभीती

(अर्थ : जळो तुमचे जिणे. ह्या अस्थीचर्ममय देहावर जितके प्रेम करता तितके जर तुम्ही प्रभु रामचंद्रावर केले असते तर या भव दु:खातून तरला असतात.)

दुपार
*संध्याकाळ*
*रात्र*
*सकाळ*

अशा प्रहरातून डिझॉल्व पध्दतीने वेगवेगळ्या अँगल्सनी डोंगर, उतरण, सपाट रस्ता, अशी लोकेशन्स बदलत उंट चालत राहतो. त्याची वेसण कधी बिहारीच्या तर कधी दाबकेच्या हातात. बाबू घायाळ स्थितीत वरतीच बसून राहिलेला.

27. सकाळ. उद्यानाच्या बाजूचे पटांगण.

सी.ओं.ची जीप उद्यानाच्या प्रवेशद्वाराशी येते. बाजूला पटांगण. तेथे उद्‌घाटनाचा कार्यक्रम होणार आहे. पटांगणात व्यासपीठ उभारण्याचे कामही सुरू आहे. सी.ओ. जीपमधून उतरतात तेव्हा उद्यान अधिक्षक, त्याचा एक सहाय्यक आणि व्यासपीठ उभारणीचे काम करणारे कॉन्ट्रॅक्टर तेथे उपस्थित आहेत. सी.ओ. साऱ्या तयारीची जातीने पाहणी करीत आहेत.

सी.ओ. : काय डांगे ?

डांगे : (उद्यान अधिक्षक) काम जोरात सुरू आहे सर. उद्या संध्याकाळपर्यंत सगळी तयारी होईल. उद्या आपण रिहल्सल करू शकतो...

सी.ओ. : गूड... गूड... कोनशिलेचं काय ?

डांगे : (दाखवत) हे काय साहेब... (प्रवेशद्वारापाशी विटांचे बांधकाम सुरू आहे. छोटी स्तंभवजा कोनशिला तयार होत आहे. कोनशिलेवर सर्वांची नावे लागणार आहेत.) दोनचार तासात काम पूर्ण होईल. (कृती करून दाखवत) मुख्यमंत्री येथे उतरतील. त्यांनी कोनशिलेचं अनावरण केलं की त्याच वेळी (बागेत हात दाखवत) तो कारंजा सुरू होईल.

: गूड गूड... पण आयत्या वेळी काही टेक्निकल फ्लॉज होणार याची काळजी घ्या.

ü

: येस सर... आधी दोन-चार वेळा तालीम करून घेतो... कोनशिलेचं अनावरण झालं की मग सी.एम.व्यासपीठावर जातील आणि उद्‌घाटन समारंभ संपला की मग उंटावर बसून उद्यानातून एक फेरी मारतील.

: ओ.के... स्टेजची तयारी कुठवर आली ?

कॉन्ट्रॅक्टर : (पुढे झुकत) जोरात काम सुरू आहे. सर, (सारे पाहतात. व्यासपीठासाठी लाकडी फळ्यांची ठोकठाक सुरू आहे. काही मजूर सामान हलवत आहेत. चार मजूर एक मोठा प्लायवूड साने आणि कॉंट्रॅक्टरच्या मधून घेऊन जातात..)

सी.ओ. : स्टेज चांगलं मजबूत झालं पाहिजे. पाच पन्नास लोक बसतील वर. आयत्या वेळी फजिती नको...

कॉन्ट्रॅक्टर : काही काळजी करू नका साहेब. एकदम मजबूत करतो बघा...

सी.ओ. : ओ.के... ओ.के... उद्या परत चक्कर मारतो मी (असे म्हणत जीपमध्ये बसतात. सारे त्यांना नमस्कार करतात.)

28. संध्याकाळ.

रस्ता.

अंधूक प्रकाश पडू लागलेला आहे. दूरवर लुकलुकणारे दिवे दिसत आहेत. थोडे अधिक पुढे आल्यावर औद्योगिक क्षेत्रातील दिव्यांचा चमचमाट दिसू लागतो. त्याही पुढे स्ट्रीट लाईट्स सुरू होतात. आता उंट आणि हे तिघेही शहराच्या वेशीजवळ उभे आहेत.

वेशीजवळ एक मोठी कमान उभारण्यात आलेली आहे. तिच्यावर 'मा.मुख्यमंत्री ना.दादासाहेब देशमुख यांचे हार्दिक स्वागत' असा बॅनर लावलेला दिसतो. कमानीतून ते आत येतात. पुढे एकदोन ठिकाणी अशाच कमानी आणि बॅनर्स दिसतात.

नगरपालिकेच्या उद्यानाचा परिसर दिसतो. त्याच्या समोरच्या मोठ्या पटांगणावर लाईटसच्या उजेडात समारंभासाठी व्यासपीठ बांधण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

तेथून उंट पुढे येतो. नगरपालिका कार्यालयावरून पास होतो.

29. सी.ओं.चे निवासस्थान. तिघेही उंटाला घेऊन तिथे येतात. बाबू लंगडत लंगडत जाऊन दारावरची बेल वाजवतो. दाबके आणि बिहारी उंटाला धरून बाहेरच उभे. दरवाजा उघडला जातो पण तेथे सी.ओ. ऐवजी चंद्रा उभी. तिला पाहून बाबू चिडतो.

बाबू : तू काय करतीस हितं आजून ? घरी न्हाय गेलीस ?

चंद्रा : निघतच व्हते. सायबांचं जेवन झालं आत्ताच. ('कोण आहे ?' असा आवाज आणि त्या पाठोपाठ सी.ओ. बाहेर येतात. बाबूला आणि उंटासह त्या दोघांना बघून ते मनातल्या मनात स्वस्थ होतात. पण बाहेरून तसे दाखवत नाहीत.)

बाबू : (हात जोडून) उंट आणलाय सायेब... (सी.ओ.बाबूकडे दुर्लक्ष करत. दाबकेला हाक मारतात.

सी.ओ. : दाबके ऽऽऽ

ü

दाबके : (झुकत झुकत) जी सर !

सी.ओ. : मी तुम्हाला काय सांगितलं होतं ? (दाबके गोंधळलेला.)

सी.ओ. : समारंभाच्या दोन दिवस आधी उंट पोहोचला पाहिजे. काय ? (दाबके समजलं या अर्थी मान हलवतो.)

सी.ओ. : आणि तुम्ही आता... सकाळी कार्यक्रम आणि आता येताय ?

बिहारी : साब, बिचमे ट्रक का…

सी.ओ. : (तडकत) मला शहाणपणा शिकवतोस तू ? मला ? ट्रक बिघडला त्यामुळे उंट येऊ शकला नाही असं सी.एम.ना सांगू मी ? का तिथं येऊन धक्का मारायचा होता मी ?

बिहारी : पन साब मसीन के बारेमे हम क्या कह सकते है ? वो तो आपने हाथ मे नही, कभी भी कुछ भी हो सकता है.

सी.ओ. : माझ्याशी आर्ग्युमेंट करू नको मूर्खासारखी... गेल्या सहा महिन्यांपासून रात्रंदिवस मरतोय मी या प्रॉजेक्टसाठी. मला काय फक्त एवढं एकच काम आहे का ? एक साधा उंट वेळेवर आणू शकत नाही तुम्ही... बसून पैसा खाताय शासनाचा... एकजात नालायक साले ! (बिहारी संतापाने थरथरू लागतो. बाबू दाबके हात जोडून तसेच उभे. बिहारीला खोकल्याची उबळ येते पण तो ती दाबतो. तो प्रतिकार त्याच्या चेहेऱ्यावर व डोळ्यातून दिसतो. तो आवंढा गिळतो.)

सी.ओ. : (हाक मारत) चंद्रा ऽऽऽ

चंद्रा : जी सायेब...

सी.ओ. : (निर्देश करत) ती फाईल घे जरा इकडं !

चंद्रा : आनते सायेब. (बाजूच्या टेबलावर पडलेली फाईल आणून देते. सी.ओ. त्यातून तीन पाकिटं बाहेर काढतात आणि)

सी.ओ. : दाबकेऽऽऽ

दाबके : जी सर ?

सी.ओ. : घरी जाण्यापूर्वी उंट डांगेच्या ताब्यात द्या !

दाबके : येस सर !

सी.ओ : सकाळपर्यंत सजवून तयार ठेवायला सांगा !

दाबके : येस सर !

सी.ओ. : (देत) ही तुम्हा तिघांसाठी पत्रं...

दाबके : (धीर करून) कसली पत्रं सर ?

: (दाबके अगतिकपणे थरथरत्या हातानं पत्रं घेतो. बाबू हळूहळू तसाच जमिनीवर बसू पाहातो पण पुन्हा वर उठतो. त्याच्या डोळ्यातून पाणी गळू लागते. बिहारी खोकू लागतो.)

सी.ओ. : वाचता येतं ना ? तुम्हाला कितीही सहानुभूती दाखवली तरी सुधारणार नाही तुम्ही लोक... (चंद्राची असहाय प्रतिक्रिया) (हाकलण्याच्या सुरात) ओके फॉर नाऊ ! (ते तिघेही बाहेर पडतात)

ü

30. **सकाळ**.

बाबूची खोली. छोट्या आरशात चंद्राचा चेहेरा दिसतो. कपाळावर कुंकू नाही. क्षणभर ती तशीच स्वत:ला निरखीत राहाते आणि नंतर चट्कन टिकली लावते. डोळ्यात काजळ घालते. पुन्हा आरशात पाहते. तिने ठेवणीतली साडी नेसली आहे. घराच्या एका कोपऱ्यात चुलीवर चहाचे आधण उकळताना दिसते. दुसऱ्या कोपऱ्यात भिंतीला उशी लावून तिच्या आधाराने काटकोनात बसलेला बाबू दिसतो. त्याच्या तोंडावरील खरचटल्याच्या खुणा आता अधिक अस्पष्ट झालेल्या आहेत. हाताचे पंजे, कोपर, गुडघे, पोटऱ्या खरचटलेल्या ठिकाणी औषध लावून चिकटवलेला कापूस दिसतो. बाबू चंद्राच्या हालचालींकडे असहाय क्रूद्धपणे पाहत आहे. चंद्रा चुलीजवळ जाऊन चहाचे दोन कप भरते. एक कप आणून बाबूसमोर ठेवते. पुन्हा चुलीजवळ जाऊन आपला चहा बशीत ओतून घाईघाईने पिऊ लागते.

बाबू : बिहारीला तांदळाची पेज करून देऊन ये.

चंद्रा : मला आता कार्यक्रमाला जायाचं हाय.

बाबू : इतक्या लवकर ? शीएमसाहेब यायला येळ हाय आजून. मला बी जायाचं हाय कार्यक्रमाला. जाता जाता देऊन जा.

चंद्रा : सायबानी लवकर बोलवलंय मला...

बाबू : (उसळत) जरा उशीरा गेलीस तर मरत नाय तो भडवा !

चंद्रा : त्या देव मानसाला कशापाय शिव्या देता. मला बोला काय ते...

बाबू : तुला नोकरीत कायम केली, म्हणून तो देव माणूस, ही खोली राहायला दिली म्हणून देव माणूस…आणि मी टेंपरवारी म्हणून राक्षस…

चंद्रा : मी कवा म्हनलं तुमाला तसं ?

बाबू : जादा नखरे करू नको तू..

चंद्रा : कार्यक्रम झाल्यावर देते पेज नेऊन. मला सायबानी आर्जन्ट बोलवलंय…

(असं म्हणून चपला घालून निघून जाते. बाबू उद्रेकानं चहाच्या कपावर लाथ मारतो.)

31. दुपार. घाट.

फोरग्राऊंडला मोरीवर कलंडलेला ट्रक. त्याच्या मागे जीप... जीप हळूहळू ट्रकजवळ येऊन थांबते ड्रायव्हर उडी मारून उतरतो. अधिक्षक आणि क्लार्क दोन्ही बाजूंनी पटापट खाली उतरतात.

अधिक्षक : अरे बापरे, आपलाच हा ट्रक (ड्रायव्हरला) काय रे नामदेव ?

नामदेव : हो साहेब, आपलीच ही गाडी... नशीब म्हणायचं की खाली गेली नाही.

क्लॉर्क : पण आत तर कोणीच दिसत नाही.

नामदेव : काय बरं-वाईट झालं त्यांचं, कळायला पत्ता नाही...

अधिक्षक : चला आधी, फोन गाठू एखादा आणि साहेबांना खबर देऊ... ते वाट बघत असतील...

32. **दुपार**.

ü

समारंभाचं ठिकाण. एखाद्या हिंदी चित्रपटातील सवंग गाण्याची रेकॉर्ड मोठ्या आवाजात सुरू आहे. मोठा जनसमुदाय जमलाय. एका बाजूला भव्य व्यासपीठ. त्यावर फुलांची सजावट. मागच्या मोठ्या पडद्यावर - समारंभाचा बॅनर. त्यावर फुलांच्या माळा सोडलेल्या. एकीकडे सरकारी गाड्यांचा मोठा ताफा उभा दिसतो. बंदोबस्तासाठी पोलिस मोठ्या संख्येने उभे आहेत. सीएमना सलामी देण्यासाठी पोलिसांचा एक गटही तैनात आहे. काही लोक बसलेले. काही गटागटाने उभे.

स्टेजवरुन कॅमेरा समोरचे दृश्य टिपतो. ग्रामस्थांची गर्दी, फोटोग्राफर्स, वनमंत्री, आमदार, नगराध्यक्ष, कलेक्टर, सी.ओ., काही निवडक अधिकारी आणि कार्यकर्ते सी.एम.ची वाट बघत उभे आहेत. मुख्यमंत्र्यांना थेट स्टेजवर आणता यावे यासाठी व्यासपीठाच्या बाजूलाच प्रवेशद्वार केले आहे. तेही फुलांनी सजविलेले.

स्टेजच्या दुसऱ्या बाजूला तृतीय-चतुर्थश्रेणी पुरुष-स्त्रिया गटा गटाने बसलेले. त्यात सफाई कामगार, शिपाई, बिगारी, हमाल असे लोक. त्यांच्यात बाबूही बसलेला दिसतो. स्टेजच्या कोपऱ्यात म्हणजे जेथून वर चढण्याचा जिना आहे तेथे हातात एक फाईल घेऊन दाबके उभा. त्याच्या मागे एक लांबलचक काठीला ओळीने अडकवून ठेवलेले पुष्पहार आणि त्यांची राखण करीत असलेली चंद्रा. स्टेजच्या दुसऱ्या बाजूला सजवलेला उंट, त्याला धरून उभा असलेला एक कर्मचारी आणि डांगे... अशी तयारी दिसते.

सीएमना एस्कॉर्ट करणाऱ्या गाडीचा सायरन ऐकू येतो. 'आले आले' असा गलका होतो. काहीजणांच्या माना उंचावतात. काहीजण उठून उभे रहातात. पोलिस अॅलर्ट होतात. दूरवरून येणारा गाड्यांचा ताफा दिसतो.

आता कॅमेरा सी.एम.च्या गाडीमध्ये. तेथून तो जमावाचे चित्रण करत हळू हळू पुढे येतो. गाडी थांबते. सी.एम.च्या खांद्यावरून कॅमेरा चित्रण करतो. बाहेर वनमंत्री, कलेक्टर. एस.पी.सॅल्यूट मारतात. वनमंत्री नमस्कार करून सी.एम.च्या गळयात हार घालतात. कॅमेऱ्याच्या फ्लॅशचा चकचकाट होतो.

शेजारी ठेवलेल्या ठोकळ्यावर उभे राहून सी.एम. पोलिसांची कडक सलामी स्वीकारतात आणि झपाझप व्यासपीठाकडे चालू लागतात. त्यांच्यामागे वनमंत्री आणि इतरही धावू लागतात.

निवेदिका : (तिचा फक्त आवाज ऐकू येत आहे.) माननीय मुख्यमंत्र्यांचं आगमन झालेलं आहे आणि आता कार्यक्रमाला सुरुवात होत आहे. मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती करते की त्यांनी नवीन उद्यानाच्या कोनाशीलेचं अनावरण करावं. कोनशिलेची दोरी सी.ओ. त्यांच्या हातात देतात. दोन्ही बाजूला अन्य मान्यवर. दोरी ओढतात. कोनशिलेवरचा मखमली पडदा दूर होतो. त्यावरील नावांची मोठी जंत्री आणि मजकूर दिसतो. त्याचवेळी उद्यानातील कारंजे सुरू झाले आहेत. प्रेक्षक टाळ्या वाजवतात. सनईचा आवाज.

निवेदिका : आता सर्व मान्यवरांनी व्यासपीठावर स्थानापन्न व्हावं अशी मी त्याना विंनती करते. (सी.एम., त्यांच्या पाठोपाठ वनमंत्री, आमदार नगराध्यक्ष, कलेक्टर, सी.ओ. आणि इतर 10/20 कार्यकर्ते वरती चढतात. एक नटलेली मुलगी (पाचवीतली) स्टेजवर

ü

चढण्याचा प्रयत्न करताना दिसते. सी.एम. मागे झुकून आपल्या प्रायव्हेट सेक्रेटरीच्या कानाला लागतात. पी.एस. धावत जाऊन त्या मुलीला हात देऊन वर घेतात आणि पहिल्या रांगेतील एका टोकाच्या खुर्चीवर बसवून पुन्हा सी.एम.च्या मागे जाऊन उभे राहतात.)

निवेदिका : माननीय मुख्यमंत्री नामदार दादासाहेब देशमुख यांनी दीप प्रज्वलन करावं अशी मी त्याना विनंती करते.

(सी.एम. उठतात. त्यांच्यासोबत वनमंत्री. कोपऱ्यात मोठी समई असते. तिकडे वळतात. सी.ओ. अदबीने मेणबत्ती पेटवून सी.एम.च्या हातात देतात. सी.एम. वाती पेटवतात. फोटोग्राफर्सची रेटारेटी. सी.एम. पोज देतात. फ्लॅशचा चकचकाट होतो.

(सनई वाजत आहे. वाजू लागते. सी.एम. उभे. एकजण आपल्या हातातील ट्रे सी.ओं.कडे देतो. सी.ओ. ट्रे घेऊन वनमंत्र्यांसमोर उभे. वनमंत्री प्रथम शाल घेऊन सी.एम.च्या अंगावर घालतात. तोवर चंद्रा भलामोठा पुष्पहार सी.ओ.कडे आणून देते सी.ओ. तो वनमंत्र्यांना देतात. वनमंत्री सी.एम.ना घालतात. नंतर ट्रेमधील चांदीचा रथ वनमंत्री सी.एम.ना देतात. सी.एम.फक्त हात लावून चेहेऱ्यावर हसू आणत पोज देतात. फोटोचा चकचकाट होतो. कॅमेरा लोकांवर. ते टाळ्या वाजवताना दिसतात.)

33. (सनईच्या आवाजात बिहारीच्या भयंकर खोकण्याचा आवाज मिसळतो. बिहारीची अंधारी कळकट खोली. वरच्या खिडकीतून काही प्रकाशकिरण आत येत आहेत. बिहारी खोकत खोकत उठतो. लटपटत शेजारच्या मडक्यातील पाणी घेतो आणि पुन्हा खाली बसून पाणी पिण्याचा प्रयत्न करतो. पण खोकल्याची बेफाम उबळ ते पाणी परतवून लावते. त्याचे डोळे लाल होतात. तोंडातून लाळ बाहेर येऊ लागतो. तो तळमळत छाती चोळू लागतो. डोळे मिटून घेतो. उघडतो. पुन्हा चटईवर आडवा होतो.

(बायकोचे तुटलेले मुंडके आणि निष्प्राण डोळे तुकड्या तुकड्याने त्याच्या नजरेसमोर येतात. हळू हळू तो बेशुद्ध होत आहे.)

34. (पुन्हा सनईचा आवाज. व्यासपीठ. निवेदन ऐकू येते.)

निवेदिका : समारंभाचे प्रास्ताविक नगरपालिकेचे मुख्याधिकारी श्री.सानेसाहेब यानी करावं अशी मी त्याना विनंती करते. (बंद गळ्याचा काळा कोट घातलेले सी.ओ आपले भाषण वाचू लागतात.)

सी.ओ. : आजचा हा बालदिन नगरपालिकेच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखा आहे. मी जेव्हा ('मी' वर जोर) येथे कार्यभार स्वीकारला त्याचवेळी नगरपालिकेच्या उद्यानाची दुर्दशा माझ्या लक्षात आली होती. झोपडपट्टीचं अतिक्रमण उठवून ह्या उद्यानाचं नुतनीकरण करायचं आणि मुलाना खेळण्यासाठी उंट आणायचा असं स्वप्नं मी त्याच वेळी पाहिलं होतं. ('माझ्या' वर जोर) (नगराध्यक्षंचा आश्चर्य व्यक्त करणारा कटाक्ष) परंतु आर्थिक तरतुदीअभावी आणि अतिक्रमण हलविण्याच्या निर्णयाअभावी हे काम बराच काळ रेंगाळत राहिलं... परंतु असो... ज्याचा शेवट गोड ते सारेच गोड... आज ते स्वप्नं पूर्ण होत आहे. उद्यानाचे नुतनीकरण आणि उंट आणण्याच्या कामात (उभे राहून

ü

कंटाळलेला दाबके पाय बदलतो. त्याचा चेहेरा पुढील शब्द ऐकण्यास उत्सुक) नगराध्यक्ष आबासाहेबांचा सिंहाचा वाटा आहे. या कामगिरीबद्दल बालगोपाळ त्याना नक्कीच दुवा देतील. (आबासाहेबांचा चेहेरा उजळतो. सी.एम. त्यांच्या चेहेऱ्यावरील बदल धूर्तपणे टीपत आहेत. मुलांबरोबरच सर्वजण टाळ्या वाजवतात.)

निवेदिका : यानंतर नगराध्यक्ष आबासाहेब पाटील आपले विचार व्यक्त करतील. (आबासाहेब धोतराचा सोगा उचलून बोलू लागतात. बोलतांना हातवारे करण्याची सवय.)

आबा : माझ्या बंधूनो आणि भगीनींनो, कोणत्याही शहराचं सौंदर्य हे त्या शहरात असणाऱ्या

उद्यानांवर अवलंबून असतं, (बाबूचा केवीलवाणा चेहेरा दिसतो. त्यावर बसलेल्या माशा तो हाकलतो) त्या शहरात मुलांसाठी कोणत्या योजना राबवल्या जातात यावर

अवलंबून असतं. आणि म्हणून इतर सर्व योजना बाजूला ठेवून आम्ही ('आम्ही'वर जोर) ह्या वर्षी प्रथम ह्या कामासाठी पैसा उपलब्ध करून दिला (आमदार जाधव सी.एम.च्या कानाला लागतात. सी.एम. मुत्सद्दीपणे स्मीत करतात) आणि त्यामुळेच आज हे उद्यानाचं काम पूर्ण झालेलं आणि हा उंट इथं आलेला दिसत आहे. यासंबंधीची स्कीम आम्ही स्वत: सी.ओं.बरोबर बसून तयार केली. सी.ओ. नवीन असल्यामुळे अनेक गोष्टी त्याना समजावून सांगाव्या लागतात. (सी.ओ नर्व्हस) मात्र या कामी आमदार जाधव (त्या गटाच्या टाळ्या) आबासाहेब आणि मुख्यमंत्री ना.देशमुखसाहेब यानी जे सहकार्य दिलं, मार्गदर्शन केलं ते फार मोलाचं आहे. मी त्याना धन्यवाद देतो. आयुष्यात माझ्या कारकिर्दीत मी एक चांगलं काम करू शकलो ('माझ्या' व 'मी' वर जोर) यांचा मला फार आनंद होत आहे. (हात जोडतात. किरकोळ टाळ्या पडतात.)

निवेदिका : आता आमदार जयसिंगराव जाधव यानी आपले विचार प्रकट करावेत अशी मी त्यांना विनंती करते.

आमदार : (बोलायला उठतात तेव्हा त्या विशिष्ट गटाच्या टाळ्या. शिवाय 'झिंदाबाद - विजय असो' च्या घोषणा होतात. आमदार शांततेसाठी हात वर करतात. सर्वत्र शांतता) आज हे जे नगरपालिकेचं साने गुरूजी उद्यान उभं आहे त्या जागेवर झोपडपट्टी संघटनेनं दावा केला होता. गेली जवळपास दहा वर्ष तिथं दीड दोनशे कुटुंबं राहात होती. ती जागा त्यांच्या मालकीची झाली होती. पण सी.एम.साहेबानी फोन करून जेव्हा मला गळ घातली तेव्हा झोपडपट्टी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून आम्ही मार्ग काढला. त्यांना वेगळी जागा घेण्यासाठी आम्ही राजी केलं. (टाळ्या) आम्ही जर आडमुठं धोरण स्वीकारलं असतं. लोकांना भडकवलं असतं कोर्टात गेलो असतो. तर हा जागेचा प्रश्न वर्षोन् वर्षे धूळ खात पडला असता. काहीजणांची आपल्या स्वार्थी राजकारणासाठी तशी इच्छासुद्धा होती ! (वनमंत्र्यांकडे खोचक कटाक्ष. वनमंत्र्यांचा चेहेरा मख्ख) पण आपल्याला कल्पना आहेच (छातीवर हात ठोकत) कोणत्याही चांगल्या कामाच्या मागं, मग ते विरोधी पक्षाचं का असेना, हा बहाद्दर खंबीरपणे उभा असतो. आमच्या ह्या सहकार्याच्या भूमिकेमुळेच आज हा उंटही इथं येऊ शकला... वनमंत्री बोरावकेसाहेब हे आपल्या जिल्ह्याचे पालकमंत्री.

ü

पण ते सारखे मुंबईत असतात. आपल्याला देण्यासाठी त्यांच्याकडे वेळ नाही. मुंबईवरूनच ते आदेश सोडत असतात. हा उंट इथं आल्यामुळं आता त्यांनी उंटावरून शेळ्या हाकण्याचं काम ऑफिशियली करायला हरकत नाही. (हात जोडतात काही क्षण हशा आणि टाळ्यांचा कल्लोळ. त्यात सी.एम.ही सहभागी.)

वनमंत्री : वस्तुत: उद्यानाचं नुतनीकरण आणि उंट आणणे ह्या बाबी नगरपालिकेच्या कक्षेतील आहेत. राज्याचा मंत्री म्हणून काम करीत असताना आपल्याच जिल्ह्यातील एखाद्या प्रश्नात लक्ष घालून बसणं अनेकदा अडचणीचं ठरतं. वास्तविक नगराध्यक्ष आणि सी.ओ. यानी त्यांच्या पातळीवरच हा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला होता. परंतु काही उपद्रवकारक शक्तींनी (आमदार जाधव अधिक आक्रमकपणे ऐकू लागतात) ह्या कामात अडथळे आणण्याचा प्रयत्न केल्यामुळे ते लांबणीवर पडत गेलं. मात्र ह्या प्रकरणी स्थानिक पातळीवर चालढकल चालली आहे (नगराध्यक्षांचा चेहेरा पडतो) असं जेव्हा माझ्या लक्षात आलं तेव्हा मला ह्यात लक्ष घालावंच लागलं. आमदार जाधव म्हणतात त्याप्रमाणे मी जर उंटावरून शेळ्या हाकत बसलो असतो तर लागोपाठ तिनदा या जिल्ह्यातून निवडून गेलो नसतो. हेच प्रेम येत्या निवडणूकीतही मला जनता देईल या विषयी माझ्या मनात शंका नाही (जोडलेल्या उंच हातानी सर्वांना नमस्कार करतात.)

35. (बिहारीचं घर. बिहारी खाली पडून तडफडताना दिसतो. तो हातपाय झाडत आहे. तो क्षीणपणे मदत मागताना दिसतोय. त्याच्या खोलीसमोर मोकळ्या जागेत बसलेला, एक म्हातारा उठतो. काठी टेकत टेकत बिहारीजवळ येतो. शेजारचे भांडे उचलून त्याच्या तोंडात पाणी ओततो पण ते तोंडातून बाहेर येते. बिहारी मान टाकतो. डोळे उघडे, निष्प्राण. म्हातारा हळूहळू काठी टेकत बाहेर येतो आणि सभास्थानाकडे चालू लागतो.)

वनमंत्री : (पुढे सुरू) आमचे आवडते नेते आदरणीय मुख्यमंत्री ना.दादासाहेब देशमुख यानी ह्या प्रकरणी जो जिव्हाळा दाखवला आणि जे सहकार्य केले ते व्यक्त करायला माझ्याजवळ शब्द नाहीत. (हात जोडतात. लोकांच्या टाळ्या. दाबके पाय बदलतो तर बराच वेळ उभी राहिलेली चंद्रा जमीनीवरच बसकण मारते.)

निवेदिका : (फक्त आवाज) आणि आता आपण ज्यांच्या भाषणाची अतिशय उत्सुकतेने वाट पाहत आहोत असे आपले लाडके मुख्यमंत्री...

सी.एम. : (वजनदार शब्दात आत्मविश्वासाने शैलीदारपणे बोलू लागतात.) वास्तविक आपण 'सहकार्य' हा शब्द जरा तपासून पाहण्याची गरज आहे. (सी.एम.पॉज घेतात. नजर प्रेक्षकात. वनमंत्री काळजीने सी.एम.कडे पाहाताहेत) उंट आणण्याच्या कामी आमचे 'सहकार्य' मिळाले असे म्हणण्याला काहीच अर्थ नाही कारण तो उंट आणण्याच्या आदेशच मुळात आम्ही दिला होता. (वनमंत्र्यांच्या फजितीमुळे बरेचजण हसतात. टाळ्या वाजवतात. सी.एम. प्रगल्भ स्मीत करतात) कृपया अण्णासाहेबानी गैरसमज करून घेऊ नये कारण उंट आणण्याचं श्रेय मला उपटायचं नाही. मात्र ज्यांना हे श्रेय घ्यावयाचं आहे (व्यासपीठावरील सर्वांचे चेहेरे एकामागून एक दिसतात.) त्या सर्वांच्या निदर्शनास मी एक छोटीशी गोष्ट आणू इच्छितो. (शांतता) ह्याच गावातल्या एका पाचवीतल्या मुलीनं (त्या मुलीचा क्लोजअप) मला पत्र पाठवलं होतं. (कठोर) 'गावचा बगीचा सुकलाय. उंट मरण

ü

पावलाय पण कोणीही लक्ष घालत नाही. तुम्ही लक्ष घाला आणि आम्हाला उंट पाठवा..'. (उंच स्वरात) ह्या देशाचं भलं करायचं असेल तर आमच्या नव्या, उमलत्या, उगवत्या पिढीच्या गरजांवर लक्ष केंद्रित करणं आवश्यक आहे. (टाळ्या) परंतु दुर्दैव हे की इतकी साधी सोपी गोष्ट, मुलाना उंट हवा ही, माझी यंत्रणा माझ्या लक्षात आणून देऊ शकली नाही. (व्यासपीठांवरचे सर्वजण नर्व्हस) ते काम एका पाचवीतल्या मुलीला करावं लागलं. (पुन्हा तिचा क्लोजअप) आज आम्ही त्या मुलीला मुद्दाम इथं उपस्थित ठेवलंय. (त्या खुर्चीकडे पाहतात. सर्वांच्या नजरा त्या मुलीवर. काय चाललय ते तिला नेमकं कळत नाही. ती टकमका बघतच रहाते. लोक टाळ्या वाजवतात.) आजचा हा बालदिनाचा मुहुर्त गाठून उंट येईल अशी व्यवस्था आम्ही केली आणि आज प्रत्यक्षात उंट इथं आल्याच्या आनंदात सहभागी झालो आहोत. (सी.एम.चे हे भाषण चालू असतानाच तो म्हातारा काठी टेकत टेकत बाबूच्या जवळ येतो. व त्याच्या कानाला लागून बिहारी मेल्याचे सांगतो. बाबूला आधी खरे वाटत नाही पण नंतर त्याची खात्री पटते. त्यांचा संवाद चालू असताना शब्द ऐकू येत नाहीत तर सी.एम.चे भाषण ऐकू येते. बाबू दु:खावेगाने उठतो आणि स्टेजच्या मागे येऊ लागतो.)

सी.एम. : (भाषण सुरूच) परंतु केवळ उंट आणून प्रश्न सुटणार नाहीत. ह्या उद्यानाची आणि उंटाची देखभाल नियमितपणे झाली पाहिजे. मी येथे जमलेल्या माझ्या बाल मित्राना विनंती करेन की आम्ही तुम्हाला हा जो उंट दिलाय त्यावर बसून नुसतं फिरत राहू नका तर ह्या उद्यानासारखीच तुमची मनं सुंदर कशी होतील, तुमच्या मनातील माणुसकीचा झरा सदैव कसा झुळझुळत राहील, (मरून लाकडासारखा पडलेला बिहारी दिसतो. त्याच्या तोंडून रक्ताचा एक ओघळ बाहेर आलेला आहे.) याचा विचार करायला शिका. (बाबू दाबकेचा शर्ट मागून ओढून त्याला बिहारी मेल्याची बातमी देऊ लागतो. त्यांचे बोलणे ऐकू येण्याऐवजी सी.एम.चे भाषणच ऐकू येते) आपल्याला माणसा माणसातील भेदभाव नष्ट करायचेत, तळागाळातल्या माणसाला मदतीचा हात द्यायचाय आणि एका नव्या, समृद्धा शक्तीशाली अशा भारताची निर्मिती करायचीय. जयहिंद ! जय महाराष्ट्र ! (प्रचंड टाळया)

36. (दफेदार उंटाला स्टेजजवळ घेऊन येतो आणि खाली बसवतो. सी.एम. प्रथम त्या मुलीला उंटावर बसवतात आणि नंतर आपण स्वत: बसतात. फोटोग्राफर्सची रेटारेटी फ्लॅशचा चमचमाट होतो. दफेदार उंटाला उद्यानाच्या दिशेने नेऊ लागतो. लोक उठून उभे रहातात, गर्दी करतात, त्यांचा गोंगाट सुरु. उंटापाठोपाठ वनमंत्री आणि इतर सर्व लवाजमा... त्या पाठोपाठ काही उत्साही नागरिक आणि मुलं आणि त्याना आवरणारे पोलीस अशी वरात सुरू होते. बाबू व दाबके एकमेकांचा हात धरून तसेच उभे. त्यांच्या अंगावरुन गर्दी पुढे जाते.

37. रस्ता

बाबू व दाबके उलटे फिरुन एका आवेगाने बिहारीच्या घराकडे पळू लागतात.

38. (बिहारीची खोली. पट्ट्यापट्ट्यांच्या खिडकीतून मंद प्रकाश आत येत आहे. बिहारी लाकडासारखा ताठ होऊन पडलाय. बाबूला आणि दाबकेला तो मेलाय यावर विश्वासच बसत नाही.)

ü

बाबू : (बिहारीला हलवत) बिहारीऽऽऽ बिहारीऽऽऽ नही दोस्त नहीऽऽऽ असा आमाला टाकून कसा गेलास रे तूऽऽऽ (त्याच्या डोळ्यातून अश्रू ओघळू लागतात.)

दाबके : याला थोडा आराम मिळाला असता, औषधपाणी मिळालं असतं तर जगला असता हा...काय केलंस रे बिहारी ? (रडू लागतो.)

बाबू : आता माझ्याशी भांडन कोन करणार, तत्वज्ञान कोन सांगनार ? तू मेला नाहीस बिहारी. फक्त झोपलायस. उठ ना रे... उठ (दाबके बाबूला जवळ घेऊन थोपटतो.)

दाबके : आता दु:ख करत बसायचं नाही. पुढच्या तयारीला लागलं पाहिजे. (बागेतून चालणारा उंट आणि लोकांचा जल्लोष दिसतो. उंटावरून हॅण्ड हेल्ड कॅमेरा गर्दीचे चित्रिकरण करत आहे.)

दाबके : तरी बरं ह्याला मागचं-पुढचं कोणी नाही. नाहीतर वाट बघत थांबावं लागलं असतं.

बाबू : आसं कसं म्हन्तो तू ! गंगावतीला सांगायला नको ?

दाबके : गंगावतीला ?

बाबू : हां. रक्ताच्या नात्यापेक्षा जवळचं नातं व्हतं त्यांचं. ते लगीनपन करनार व्हते.

दाबके : काय म्हणतोस ?

बाबू : (रहस्य उघड करीत) ह्याचं पोर हाय तिच्या पोटात.

दाबके : काय बोलतोस काय बाबू ?

बाबू : तुज्या गळ्याची शपत. तिला जर आपन ह्याचं शेवटचं दर्शन मिळू दिलं न्हाय तर मानूस आणि जनावर ह्यात काय फरक ऱ्हायला ? (दाबके बाबूच्या ह्या नव्या रुपाकडं अभिमानानं पहातो.) (बागेतून फिरणारा उंट आणि त्याच्या मागे धावणारे लोक दिसतात सी.एम. हात हलवून सर्वांना प्रोत्साहित करत आहेत.)

दाबके : पण गंगावतीला इतक्या लांब निरोप द्यायला कोण जाईल आता ?

बाबू : मी जाईन

दाबके : तू ? ह्या अशा स्थितीत ?

बाबू : व्हय जाईन. हायवेला जाऊन मिळंल ती गाडी पकडून जाईन. माजी काळजी करू नको तू. इथच थांब. लोकाना जमव... मी गंगावतीला घेऊन येईपर्यंत आमची वाट बघ...

39. (बाबू बाहेर पडतो. दाबके चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या वसाहतीतून ॲप्रोच रोडला येतो. तेथून धावत हायवेच्या वळणाजवळ येतो.

40. सी.एम. आणि ती मुलगी उद्यानाला फेरी मारून पुन्हा गाडीजवळ आलेली आहेत. दफेदार उंटाला खाली बसवतो. आधी मुलगी उतरते. मग सी.एम. उतरतात. सर्वांना हात जोडून नमस्कार करतात आणि गाडीत जाऊन बसतात. सी.एम.च्या वाहनांचा ताफा निघतो. सायरनचा आवाज. सी.एम. हात हलवून सर्वांना निरोप देतात. समारंभाच्या ठिकाणाला एक दिमाखदार वळसा घालून त्याची गाडी बाहेर पडते.

41. बाबू चालतच आहे. त्याला हायवेवर यायचे आहे. इतक्यात त्याला सी.एम.च्या वाहनांच्या ताफ्याचा आवाज येतो. मान वळवून तो पाहतो. गाड्या स्पष्टपणे दिसतात.

ü

42. सी.एम.चा क्लोजअप. ते आपल्याच नादात मग्न. आजच्या कार्यक्रमाचे हिरो ठरल्याचा आनंद त्यांच्या चेहेऱ्यावर दिसत आहे. त्यांची गाडी आता गती घेऊ लागते.

43. शहरातून हायवेला जिथे सी.एम.ची गाडी वळणार आहे, तिथे बाबू उभा आहे. वाहनांचा ताफा पाहून तो तिथेच असणाऱ्या कचऱ्याच्या एका मोठ्या ढिगाऱ्यामागे थांबतो. त्याच्यामागून कॅमेरा चित्रण करतो. कचऱ्याचा मोठा ढिग आणि त्याच्या पलीकडून जाणारा ताफा दिसतो. कचऱ्याच्या ढिगाऱ्यावरील घाण आणि चकचकीत आणि लाल-पिवळ्या दिव्यांच्या गाड्या यातील विसंगती नजरेस खुपणारी.

वाहने गेल्यावर बाबू उठून उभा राहतो. आणि ढिगाऱ्याकडून रस्त्यावर येऊ लागतो. इतक्यात त्याला अर्भकाच्या केविलवाण्या रडण्याचा आवाज ऐकू येतो. तो चमकतो. हादरतो. ढिगाऱ्यात काही वस्तू हलताना दिसते. पुन: पुन्हा पाहून खात्री करून घेतो. दुपट्यात लपेटलेले एक अर्भक तेथे पडलेले आहे. तो जवळ जाऊन, हात लावून पाहतो. अर्भक उचलून हातात घेतो. ते जिवंत आहे. रडत आहे. तो त्याला छातीशी कवटाळतो आणि त्याचे मुके घेऊ लागतो.

थीम म्युझिक वाजू लागते. बाबूच्या डोळ्यातून अश्रू ओघळत आहेत. ती फ्रेम ब्लर होते आणि हळू हळू धूसर अस्पष्ट होत जाते. जणू बाबूबरोबरच प्रेक्षकांचे डोळे अश्रूंनी डबडबलेले आहेत.

**हळू हळू श्रेयनामावली येऊ लागते. समाप्त**

-----

ü